श्री गुरु गीता (मराठी)

(गुरूच्या आराधनाचे दिव्य गीत)



Copyright © 2020 T Sreenivasulu
All rights reserved.
www.sahajananda-ashram.com

समर्पण

माझे पूज्य गुरु जी श्री स्वामी शिवोम तीर्थ जी महाराज



परम पूज्य श्री स्वामी शिवोम तीर्थ जी महाराज

विषय सूची

आभार
परिचय
श्री गुरू गीता
शब्द-अर्थ (शब्दार्थ)
शक्तिपात पद्धति के आश्रम
शक्तिपात पद्धति के संत
लेखकाबद्दल

आभार

मी भारतीय लष्करात कार्यरत माझे शिष्य कर्नल टी श्रीनिवासुलू यांचे सर्व आवश्यक समन्वय करण्यासाठी आणि शेवटी ह्या पुस्तकाचे प्रकाशन सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा विशेष उल्लेख करू इच्छित आहे. परमात्मा त्यांना हवे ते मिळावे हा आशीर्वाद देवो!

या पुस्तकाचे मराठी भाषेत अनुवाद केल्याबद्दल मी नाशिक शहरातील श्री श्याम ग्वालानी यांचे आभार मानतो. सर्वोच्च ब्रह्मांडीय शक्ती सदैव त्यांच्यावर दिव्य अनुग्रहाचा वर्षाव करो!

परिचय

गुरु गीता हा मुख्यतः मानवजातीसाठी आत्म-साक्षात्काराची स्थिती प्राप्त करण्यासाठी, गुरूची अनिवार्य आवश्यकते बाबत भगवान शिव आणि त्यांची पत्नी देवी पार्वती यांच्यातला एक संवाद आहे. हा एक प्राचीन संस्कृत ग्रंथ "स्कंद पुराण "चा एक भाग आहे.

हे एक असाधारण पुस्तक आहे जे प्रत्येक व्यक्तीने तिच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमीची पर्वा ना करता वाचन्या योग्य आहे.

कोणत्याही धार्मिक दृष्टिकोनातून या पुस्तकात विवादास्पद असे काहीही नाही. जरीहि हा हिंदू मान्यतेनुसार एक देव आणि त्याची पत्नी यांच्यात घडलेला संवाद असला, तरी ही शिकवण पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहे. कोणत्याही व्यक्तीसाठी गुरुची अटळ आवश्यकता हेच या ग्रंथाचे सार. शिवाय, हे थेट घोषित करते की पृथ्वीवर काही शिष्यांना आत्म-साक्षात्काराचा मार्ग जागृत करण्याच्या हेतूने, गुरू खरोखरच काही विशिष्ट मानवी स्वरुपाच्या माध्यमातून प्रकट झालेले सर्वोच्च देवत्व आहे.

ह्या ग्रंथाची शिकवण हि स्वतःतच खूप गहन आणि प्रेरणादायक आहे. विषयाला ज्या प्रकारे सादर केले आहे त्याने पाठक निश्चितच मंत्रमुग्ध होईल. तथापि, प्रत्येकाने हे अतिव्यापक दृष्टिकोनाने समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आधुनिक विज्ञान आणि समाजाशी याचा संबंध जोडण्याचा प्रयत्न

करण्यात काही अर्थ नाही. ह्यातली शिकवण सर्वांसाठी आणि सर्व काळासाठी यथार्थ आहे. हे ग्रंथलेखन केल्यापासून बराच काळ उलटून गेल्यानंतरही सर्व योग साधकांचे लक्ष वेधून घेत आहे, ही लेखकाच्या विषयावरील प्रभुत्व दर्शवते.

पुस्तकाचे भाषांतर शब्दशः पद्धतीने केले गेले नाही. तथापि, भाषांतर करताना विषयाचे सार लक्षात ठेवले गेले आहे.

कंसात जेथे आवश्यक तेथे पुरेसे स्पष्टीकरण दिले गेले आहे जेणेकरून सर्व संस्कृतीतील लोक सहजपणे विषयाचे आकलन करू शकतील. तथापि, गंभीर प्रकारच्या वाचकांच्या फायद्यासाठी आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून देखील मूळ मजकूर देवनागरी लिपीमध्ये व रोमन लिपीमध्ये लिप्यंतरणासह दिलेला आहे.

संस्कृत भाषेमध्ये पारंगत अशा वाचकांकडून काही त्रुटी आढळून आल्या तरीही अनुवादित मजकुराची दखल घेण्याची गरज नाही कारण आजकाल संस्कृतमध्ये मूळ मजकुराचे बरेचसे भाषांतर उपलब्ध आहेत. हे हजारात एक असण्यासारखा संयोगच असेल.

तथापि, अनुवादित पुस्तक हे फारच सारगर्भित आहे आणि वाचकांना हे अगदी स्पष्ट होऊन जाईल. याचाच अर्थ मूळ संस्कृत भाषेमध्ये पारंगत असलेले वाचकही ह्या भाषांतराने नक्कीच संतुष्ट होतील अशी अपेक्षा आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे काही वाचकांना असे वाटू शकते की पुस्तकातील व्याख्या त्यांच्यासाठी समाधानकारक नाही, तरीही हे पुस्तक वाचण्यायोग्यच आहे.

भावना हीच आहे कि प्रत्येक वाचकास ह्याचा सर्वोच्च लाभ होईल.

- श्री स्वामी सहजानंद तीर्थ जी महाराज

श्री गुरुगीता

Śrī gurugītā

1. एका शुभ दिवशी कैलास पर्वताच्या शिखरावर, रम्य मनमोहक वातावरणात, निसर्गाची देवी, पार्वती देवीने, भक्तीचे साधन सांगण्यात कुशल असलेल्या श्रीशंकराला, भगवान शिवाला, भक्तीपूर्वक नमस्कार करून मोठ्या भक्तिभावाने प्रश्न विचारला.

कैलास शिखरे रम्ये, भक्ति संधान नायकम् ।

प्रणम्य पार्वती भक्त्या, शंकरं पर्यपृच्छत ॥

kailāsa śikhare ramye, bhakti saṃdhāna nāyakam I

praṇamya pārvatī bhaktyā, śaṃkaraṃ paryapṛcchata II

धन्य सौभाग्यवती स्त्री (देवी) म्हणाली:

2. हे देवांच्या देवा, परात्पर म्हणजे महानाहून महान अशा सद्गुरो,हे सदाशिवा! (भगवान शिव) हे महान सर्वशक्तिमान तुला प्रणाम ! कृपया मला गुरुच्या प्रति समर्पणाच्या ज्ञानाचे आशिर्वाद द्या.

ओं नमो देवदेवेश परात्पर जगद्गुरोः ।

सदाशिव महादेव गुरुदीक्षाम् प्रदेहि मे ॥

oṃ namo devadeveśa parātpara jagadguroḥ I

sadāśiva mahādeva gurudīkṣām pradehi me II

3. हे स्वामी,मी आपल्या चरणांवर मस्तक ठेवून नमस्कार करते. हे परमेश्वरा ! ब्रम्ह (सर्वोच्च वैश्विक आत्मा किंवा देवत्व किंवा सर्वशक्तिमान) हि मानसिक स्थिती प्राप्त करण्यासाठी मानवाने (देह आणि रक्ताच्या स्थूल शरीराने) कोणत्या मार्गाचे अनुसरण केले पाहिजे?

केन मार्गेण भो स्वामिन् देहि भ्रह्ममयो भवेत् ।

त्वं कृपां कुरु मे स्वामिन् नमामि चरणौ तव ॥

kena mārgeṇa bho svāmin dehi bhrahmamayo bhavet I

tvaṃ kṛpāṃ kuru me svāmin namāmi caraṇau tava II

ईश्वर उवाच (भगवान ईश्वर (शिव) म्हणाले);

4. हे देवि, तू माझेच दिव्य रूप, स्वरूप आहेस (म्हणजे परात्पर देवदेवता आणि त्यांची शक्ती एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखे आहेत, म्हणून ते दोन भिन्न व्यक्ती म्हणून भिन्न असू शकत नाहीत), आपण मला हा प्रश्न परोपकारी हेतूने विचारत आहात! असा हा प्रश्न पूर्वी कोणीही केला नाही. तुमच्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या इच्छेसाठी मी अवश्य देईन.

मम रूपासि देवीत्वं तत्प्रीत्यर्थं वदाम्यहं ।

लोकोपकारकः प्रश्नो न केनापि कृतः पुरा ॥

mama rūpāsi devītvaṃ tatprītyarthaṃ vadāmyahaṃ I

lokopakārakaḥ praśno na kenāpi kṛtaḥ purā II

5. तिन्ही लोकांत (प्राचीन संस्कृत ग्रंथात सांगितल्याप्रमाणे अस्तित्वातील तीन स्तर) दुर्लभ आणि सर्वोच्च सत्य मी आता आपल्यासमोर प्रकट करीत आहे. कृपया ऐका! मानवासाठी, पूज्य शिक्षक किंवा गुरूशिवाय दुसरा कोणी देव नाही. याचा अर्थ असा की मानवासाठी अस्तित्वात असलेले सर्व काही (पुजनीय किंवा विश्वास करण्यायोग्य शक्ती) पूज्य शिक्षक किंवा गुरूच्या रूपात आहे.

दुर्लभं त्रिषु लोकेषु तच्छ्रृणुष्व वदाम्यहं I

गुरुं विना ब्रह्म नान्यत् सत्यं सत्यं वरानने II

durlabhaṃ triṣu lokeṣu tacchṛṇuṣva vadāmyahaṃ I

guruṃ vinā brahma nānyat satyaṃ satyaṃ varānane II

6-7. मनुष्य जे कि मायेच्या किंवा ईश्वरीय ज्ञानास विमुख होऊन अज्ञानास वशीभूत होतात, अशा मानवांसाठी; वेद, प्राचीन विज्ञान, पुरातन महाकाव्ये, प्राचीन इतिहास, मंत्र, यंत्र आणि तंत्र, स्मृती आणि विज्ञान आणि अगम शैव आणि शक्ती यांच्याशी संबंधित विविध शास्त्र नकारात्मक सत्य व्यक्त करतांना प्रतीत होतात.

वेदशास्त्र पुराणानि इतिहासादिकानि च I

मंत्र, यंत्रादि विद्याश्च स्मृति रुच्चाट नादिकम् II

शैव शाक्ता गमादीनि अन्यानि विविधानि च I

अपभ्रंश कराणीह जीवनां भ्रान्त चेतसाम् II

vedaśāstra purāṇāni itihāsādikāni ca I

maṃtra, yaṃtrādi vidyāśca smṛti ruccāṭa nādikam II

śaiva śāktā gamādīni anyāni vividhāni ca I

apabhraṃśa karāṇīha jīvanāṃ bhrānta cetasām II

8. गुरुतत्त्व जाणल्याशिवाय यज्ञ, व्रत, तपश्चर्या, दानधर्म, जप, तीर्थयात्रा, इत्यादी विविध प्रकारांनी मानवजातीद्वारे केलेली सर्व देवतांची पूजा निष्फळ आणि अर्थहीन आहे. असे लोक (वरील कृत्ये करणारे) केवळ अंधश्रद्धेचे अनुयायी म्हणून राहतील.

यज्ञोव्रतं तपोदानं जपस्तीर्थं तथैव च ।

गुरुतत्वमविज्ञाय मूढास्ते चरते जनाः ।।

yajñovrataṃ tapodānaṃ japastīrthaṃ tathaiva ca I

gurutatvamavijñāya mūḍhāste carate janāḥ II

9. ज्ञानस्वरूप आत्म्याहून (मानव शरीराच्या गर्भागारात राहणारी स्वतंत्र आत्मा) गुरुतत्व भिन्न नाही हे शाश्वत सत्य प्रकट झाले आहे. हे सर्वोच्च सत्य आहे. म्हणून, हे पार्वती! मानवजातीमध्ये बुद्धिमान लोक "श्री गुरुतत्व " हे ज्ञान मिळवण्याचा सतत प्रयत्न करतात.

गुरुबुध्यात्मनो नान्यत् सत्यं सत्यं न संशयः ।

तल्लाभार्थं प्रयत्नस्तु कर्तव्यो हि मनीषिभिः ।।

gurubudhyātmano nānyat satyaṃ satyaṃ na saṃśayaḥ I
tallābhārthaṃ prayatnastu kartavyo hi manīṣibhiḥ II

10. मानवी शरीरात नव विज्ञान किंवा दैवी स्वरूपाचे अज्ञान कसे विकसित होते? गुप्त विद्या या शब्दाचा अर्थ काय आहे? जगन्माये चे रहस्य काय आहे कि ज्यामुळे मनुष्याद्वारे अनुभवलेल्या संसाराची निर्मिती होते? ही सखोल रहस्ये जाणून घेण्यासाठी " गुरू " शब्दाच्या ध्वनीची दीप्ती जाणून घेणे अनिवार्य आहे. (येथे "गुरु" शब्दाच्या ध्वनी रूपाचे महत्त्व अधोरेखित केले जात आहे.)

गूढविद्या जगन्माया देहेचाज्ञान संभवा ।

उदयः यत् प्रकाशेन गुरु शब्देन कथ्यते ॥

gūḍhavidyā jaganmāyā dehecājñāna saṃbhavā I

udayaḥ yat prakāśena guru śabdena kathyate II

11. श्रीगुरुचरणाच्या सेवेने मनुष्य जन्म - मृत्युच्या अखंड चक्रातुन मुक्ती पावतात. हे गुप्तज्ञान तुझ्या अनुरोधानुसार मी तुला कथन करत आहे.

सर्वपाप विशुद्धात्मा श्रीगुरो पादसेवनात् ।

देही ब्रह्म भवेद्यस्मात् त्वत् कृपार्धं वदामि ते ॥

sarvapāpa viśuddhātmā śrīguro pādasevanāt I

dehī brahma bhavedyasmāt tvat kṛpārdhaṃ vadāmi te II

12. जर कोणी श्रीगुरुचरणकमलांची उपासना करून मस्तकावर पाणी (अमृततुल्य) ओतले असता म्हणजेच स्नान केले असता, सर्व तीर्थांमध्ये स्नान केल्याचे पुण्यफल त्यास मिळते.

गुरुपादांबुजं स्मृत्वा जलं सिरसि धारयेत् ।

सर्वतीर्धावगाहस्य संप्राप्नोति फलं नरः ll

gurupādāṃbujaṃ smṛtvā jalaṃ sirasi dhārayet l

sarvatīrdhāvagāhasya saṃprāpnoti phalaṃ naraḥ ll

13. श्रीगुरुचरणतीर्थ हे एखाद्या व्यक्तीस संसारसागर पार करण्यास मदत करण्यासाठी समर्थ आहे. पापक्षालन करणारे आहे. ज्ञानरूपी तेजाला उज्ज्वल, अधिक प्रकाशित करणारे, ज्ञानवर्धक आहे.

शोषणं पापपंकस्य, दीपनं ज्ञान तेजसाम् l

गुरु पादोदकं सम्यक् संसारार्णव तारकम् ll

śoṣaṇaṃ pāpapaṃkasya, dīpanaṃ jñāna tejasām l

guru pādodakaṃ samyak saṃsārārṇava tārakam ll

14. एखाद्याने हे पवित्र गुरुपादोदक, श्रीगुरुचरणतीर्थ, जन्म आणि मृत्यूच्या कर्मचक्रातून मुक्त होण्यासाठी, ज्ञान आणि वैराग्यप्राप्तीसाठी प्राशन करावे.

अज्ञान मूलहरणं, जन्मकर्म निवारणम् l

ज्ञानवैराग्य सिद्ध्यर्थं गुरुपादोदकं पिबेत् ll

ajñāna mūlaharaṇaṃ, janmakarma nivāraṇam l

jñānavairāgya siddhyarthaṃ gurupādodakaṃ pibet ll

15. गुरुचरणतीर्थ (गुरुचे पाय धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे) सेवन करणे, गुरूंकडून उरलेले पदार्थ (गुरूंनी खाल्ल्यानंतर उरलेले अन्न) "प्रसाद" (भगवंताच्या वेदीवर अर्पण केल्यावर शिष्याकडे परत

आलेले) म्हणून स्वीकारने, श्रीगुरुमूर्तीचे अंतरी सदैव ध्यान करित गुरूने दिलेल्या मंत्राचा सदा जप (पुनरावृत्ती) करणे ही शिष्य किंवा विद्यार्थी ची पवित्र कर्तव्ये आहेत.

गुरोः पादोदकं पीत्वा, गुर्ोरुच्छिष्ट भोजनम् ।

गुरु मूर्तेः स्सदा ध्यानं गुरुमंत्रं सदा जपेत् ॥

guroḥ pādodakaṃ pītvā, gura॑rucchiṣṭa bhojanam I

guru mūrteḥ ssadā dhyānaṃ gurumaṃtraṃ sadā japet II

16. पूजनीय गुरूंचे निवासस्थान (जिथे ते राहतात) खरोखरच काशी (भारतातील आधुनिक काळातील वाराणसी शहर) शहरासारख्या पवित्र केंद्रांपैकी सर्वात पवित्र स्थान आहे! पूजनीय गुरूंचे चरणतीर्थ खरोखरच गंगा नदीच्या पवित्र पाण्यासारखेच आहे. गुरू खरंच विश्वाचा प्रभु (विश्वनाथ) आहे. श्रीगुरुच निश्चित मुक्ति किंवा मोक्ष मंत्र (तारकमंत्र) देणारे सर्वोच्च ब्रह्मस्वरूपच होत.

काशीक्षेत्रं तन्निवासो, जाह्नवी चरणोदकम् ।

गुरोः विश्वेश्वरः साक्षात् तारकं ब्रह्मनिश्चितम् ॥

kāśīkṣetraṃ tannivāso, jāhnavī caraṇodakam I

guroḥ viśveśvaraḥ sākṣāt tārakaṃ brahmaniścitam II

17. ज्यांचे चरणतीर्थ (त्यांचे पाय धुण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी) खरोखरच गया (आजकालचे भारतातील गया शहर) च्या पवित्र तीर्थासारखे आहे अशा श्रीगुरूला नमस्कार असो. श्रीगुरुच्या प्रति समर्पण कि जे खरोखरच “अक्षय पात्र ” (दैवीय इच्छापूर्ती करणारे पात्र जे

हव्या असलेल्या भोजनाने भरून जाते) आहेत. श्रीगुरुंना वंदन असो जे खरोखरच "प्रयाग" (आधुनिक काळातील अल्लाहाबाद शहर, जिथे गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम आहे) येथील पवित्र संगमच आहेत.

गुरोः पादोदकं यत्तु गयाऽसौ सौऽक्षयोवटः ।

तीर्थराज प्रयागश्च, गुरुमूर्ते नमो नमः ॥

guroḥ pādodakaṃ yattu gayā'sau sau'kṣayovaṭaḥ I

tīrtharāja prayāgaśca, gurumūrte namo namaḥ II

18. श्रीगुरुमूर्तीचे नित्य स्मरण करावे, गुरुनामाचा सदा जप करावा, श्रीगुरुची आज्ञा मनःपूर्वक कटाक्षाने पाळावी व आपल्या जीवनात अंमलात आणावी, तसेच हे नेहमी लक्षात ठेवावे कि गुरुतत्वाखेरीज दुसरे काहीही पवित्र नाही आणि अशाप्रकारे नतमस्तक होऊन सदैव गुरूंना नमन करावे.

गुरुमूर्तिं स्मरेन्नित्यं गुरुनामं सदा जपेत् ।

गुरोराज्ञं प्रकुर्वीत, गुरोरन्यन्न भावयेत् ॥

gurumūrtiṃ smarennityaṃ gurunāmaṃ sadā japet I

gurorājñaṃ prakurvīta, guroranyanna bhāvayet II

19. गुरुमुखस्थित ब्रह्म हे गुरूच्या कृपेनेच प्राप्त होते. ज्याप्रमाणे कुलीन स्त्री इतर (आपल्या पतीव्यतिरिक्त) पुरुषाचा विचार देखील करीत नाही, त्याप्रमाणे शिष्याने सदा श्रीगुरुंचे पूजन व ध्यान करावे.

गुरुवक्त्र स्थितं ब्रह्म, प्राप्यते त्त्पसादतः ।

गुरोध्यानं सदाकुर्यात् कुलस्त्री स्वपतेर्यथा ll

guruvaktra sthitaṃ brahma, prāpyate tratpasādataḥ I

gurodhyānaṃ sadākuryāt kulastrī svapateryathā II

20. विद्यमान जीवन, कुटूंब, जात, प्रतिष्ठा, संपत्ती, ईत्यादींची आसक्ती सोडून देऊन केवळ पूजनीय गुरूचा आश्रय घ्यावा. (हे सर्व गुरुचे ध्यान करण्याच्या मार्गात अडथळे ठरू नयेत.)

स्वाश्रमं च स्वजातिं च स्वकीर्तिं पुष्ठिवर्धनम् l

एतत्सर्वं परित्यज्य गुरोरन्यन्न भावयेत् ll

svāśramaṃ ca svajātiṃ ca svakīrtiṃ puṣṭhivardhanam I

etatsarvaṃ parityajya guroranyanna bhāvayet II

21. अनन्यभावाने, एकनिष्ठेने जे कोणी गुरूचे चिंतन करतात त्यांना अनंत सर्वोच्च ब्रह्मज्ञान अगदी सहजपणे प्राप्त करणे शक्य आहे. म्हणून, नेहमीच श्रीगुरुची आराधना, भक्ती करावी.

अनन्याश्चिन्तयन्तोमां, सुलभं परमं पदम् l

तस्मात् सर्व प्रयत्नेन, गुरोराराधनं कुरु ll

ananyāścintayantomāṃ, sulabhaṃ paramaṃ padam I

tasmāt sarva prayatnena, gurorārādhanaṃ kuru II

22. सर्व विज्ञानांचे ज्ञान केवळ पूजनीय गुरूंच्या कृपेनेच प्राप्त होते, हे त्रैलोक्यात (स्वर्ग लोक, पितृ लोक आणि मृत्यू लोक) मान्य आहे.

त्रैलोक्ये स्फुटवक्तारो, देवाद्यासुर पन्नगाः I

गुरुवक्त्र स्थिता विद्या गुरु भक्त्यातु लभ्यते II

trailokye sphuṭavaktāro, devādyāsura pannagāḥ I

guruvaktra sthitā vidyā guru bhaktyātu labhyate II

23. “गुरु” या पवित्र शब्दामध्ये, ‘गु’ शब्द अंधाराचा किंवा अज्ञानाचा प्रतीक आहे. ‘रु’ हे तेज किंवा ज्ञानाचे प्रतीक आहे! याचा अर्थ असा की "गुरु" हे शब्दच अज्ञानरुपी अंधकार नष्ट करण्यासाठी आणि ज्ञानाची अग्नि प्रज्वलित करण्यासाठी पुरेसे सामर्थ्यवान आहेत ह्यात मुळीच संशय नाही.

गुकार स्त्वन्थकाराश्च रुकारस्तेज उच्यते I

अज्ञान ग्रासकं ब्रह्म, गुरुरेव न संशयः II

gukāra stvanthakārāśca rukārasteja ucyate I

ajñāna grāsakaṃ brahma, gurureva na saṃśayaḥ II

24. गुरु या शब्दातील "गु" कार हा पहिला वर्ण मायादि गुण (अंधकार / अज्ञान) प्रगट करणारा आहे. दुसरा "रु "कार (प्रकाश किंवा ज्ञान) असून मायानिर्मित भ्रमनिरसन करणारा होय.

गुकारः प्रथमोवर्णो मायादि गुणभासकः I

रुकारो द्वितीयोब्रह्म, मायाभ्रांति विनाशकः II

gukāraḥ prathamovarṇo māyādi guṇabhāsakaḥ I

rukāro dvitīyobrahma, māyābhrāṃti vināśakaḥ II

25. हे स्पष्ट आहे की “गुरु” म्हणजे परम ब्रह्म. आणि स्वर्ग लोकाच्या प्राण्यांसाठीसुद्धा गुरु ही दैवी कृपा मिळविणे दुर्लभ आहे. इतकेच नव्हे तर विभिन्न लोकातील जनजाती (संस्कृत ग्रंथांनुसार हा हा आणि हू हू जनजाती) जे कि “गंधर्व” (स्वर्ग लोकातील संगीतकार) शासित आहेत, ते देखील पूज्य गुरूची पूजा करतात.

एवं गुरु पदं श्रेष्टं, देवानामपि दुर्लभम् ।

हाहा हूहू गणश्चैव, गंधर्वैश्च प्रपूज्यते ।।

evaṃ guru padaṃ śresṭaṃ, devānāmapi durlabham I

hāhā hūhū gaṇaścaiva, gaṃdharvaiśca prapūjyate II

26-27. हे अगदी स्पष्ट आहे की पूजनीय गुरूपेक्षा श्रेष्ठ काहीही नाही. म्हणून जेणेकरून गुरू संतुष्ट होईल असे आसन, शयन, वस्त्र, भूषण, वाहन इ. गुरूला अर्पण करावीत. फक्त “गुरु” हा शब्द शाश्वत आणि सत्य आहे. बाकी सर्व काही क्षणिक आहे आणि विनाशाच्या (काळाच्या ओघात)अधीन आहे.

ध्रुवं तेषांच सर्वेषां नास्ति तत्त्वं गुरोः परम् ।

आसनं शयनं वस्त्रं, भूषणं वाहनादिकम् ।।

साधकेन प्रदातव्यं, गुरु संतोषकारकम् ।

गुरोराराधनं कार्यं, स्वजीवित्वं निवेदयेत् ।।

dhruvaṃ teṣāṃca sarveṣāṃ nāsti tattvaṃ guroḥ param I

āsanaṃ śayanaṃ vastraṃ, bhūṣaṇaṃ vāhanādikam II

sādhakena pradātavyaṃ, guru saṃtoṣakārakam I

gurorārādhanaṃ kāryaṃ, svajīvitvaṃ nivedayet II

28. आचरणाने, मनाने, शुद्ध शरीराने सदैव गुरूची आराधना करावी. गुरूच्या समोर सर्व अहंकार आणि संशय बाजूला ठेवून दीर्घ साष्टांग दंडवत, प्रणाम करावा.

कर्मणामनसावाचा नित्यं आराधयेत् गुरुम् I

दीर्घदंडं नमस्कृत्य, निर्लज्जो गुरुसन्निधौ II

karmaṇāmanasāvācā nityaṃ ārādhayet gurum I

dīrghadaṃḍaṃ namaskṛtya, nirlajjo gurusannidhau II

29. एखाद्याने आपले शरीर, इंद्रिये, प्राण, पत्नी, कुटुंबातील सदस्यआणि नातेवाईकांसह सर्वस्व पूजनीय गुरूंच्या सेवेसाठी समर्पित केले पाहिजे.

शरीरमिंद्रियं प्राणं, सद्गुरुभ्यो निवेदयेत् I

आत्मदारादिकं सर्वं, सद्गुरुभ्यो निवेदयेत् II

śarīramiṃdriyaṃ prāṇaṃ, sadgurubhyo nivedayet I

ātmadārādikaṃ sarvaṃ, sadgurubhyo nivedayet II

30. मानवी शरीर असंख्य कृमि, कीटक, भस्म, विष्ठा, दुर्गन्ध, मलमूत्र, श्लेष्म, रक्त, त्वचा, मांस आदींनी युक्त आहे. म्हणूनच,या मानवी शरीराप्रति आसक्ती त्यागली पाहिजे.

कृमिकीट भस्मविष्ठा, दुर्गंधी मलमूत्रकम् I

श्लेष्म रक्तं त्वचा मांसं, वांछयेन्न वरानने II

kṛmikīṭa bhasmaviṣṭhā, durgaṃdhī malamūtrakam I

śleṣma raktaṃ tvacā māṃsaṃ, vāṃchayenna varānane II

31. संसारवृक्षावर आरूढ होऊन अज्ञानाच्या महासागरात पतन झालेल्या सर्वांचा ज्याने उद्धार केला, त्या श्रीगुरुला नमस्कार असो.

संसार वृक्षमारूढाः, पतन्तोनरकार्णवे I

येन चैवोद्धृताः सर्वे, तस्मैश्री गुरवे नमः II

saṃsāra vṛkṣamārūḍhāḥ, patantonarakārṇave I

yena caivoddhṛtāḥ sarve, tasmaiśrī gurave namaḥ II

32. पूजनीय गुरू खरंच भगवान ब्रह्मा किंवा सृष्टीचे दैवत आहेत! ते खरोखरच भगवान विष्णू किंवा जिवीकेचे स्वामी आहेत! ते खरोखर महेश्वर (शिव) किंवा विनाशाचे देव आहेत! अशा श्रीगुरुला नमस्कारावे.

गुरुर्ब्रह्म गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः I

गुरुस्साक्षात् परंब्रह्म, तस्मैश्री गुरवे नमः II

gururbrahma gururviṣṇu gururdevo maheśvaraḥ I

gurussākṣāt paraṃbrahma, tasmaiśrī gurave namaḥ II

33. या सांसारिक अस्तित्वाच्या रहस्यांचे स्पष्टीकरण देणारा, संसारसागर पार पाडणारा सेतू, शिष्यास दिल्या जाणाऱ्या सर्व ज्ञानाचा जनक, खरोखरच भगवान शिव किंवा सर्वशक्तिमानाचा अवतार असणाऱ्या गुरूला नमन असो.

हेतवे जगतामेव, संसारार्णव सेतवे I

प्रभवे सर्व विद्यानां, शंभवे गुरवे नमः II

hetave jagatāmeva, saṃsārārṇava setave I

prabhave sarva vidyānāṃ, śaṃbhave gurave namaḥ II

34. अज्ञानरूपी अंधाराने अंध झालेल्या जिवाच्या नेत्रांत ज्याने ज्ञानस्वरूपी अंजन घालून दिव्य चक्षू उघडले त्या श्रीगुरुला नमस्कार असो.

अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानांजन शलाकया I

चक्षुरुन्मीलितं येन, तस्मै श्री गुरवे नमः II

ajñāna timirāndhasya jñānāṃjana śalākayā I

cakṣurunmīlitaṃ yena, tasmai śrī gurave namaḥ II

35. हे पूजनीय गुरू! तुम्हीच माझे पालक आहात, माझे नातेवाईक आणि माझी इष्ट देवता ! सांसारिक अस्तित्वाच्या भ्रमातून दूर होऊ शकेल असे पवित्र ज्ञान देऊ शकेल अशा तुला नमस्कार.

त्वं पिता त्वंचमे माता, त्वं बंधुस्त्वं च देवता I

संसार प्रतिबोधार्थं, तस्मैश्री गुरवे नमः II

tvaṃ pitā tvaṃcame mātā, tvaṃ baṃdhustvaṃ ca devatā I

saṃsāra pratibodhārthaṃ, tasmaiśrī gurave namaḥ II

36. ज्याच्या अस्तित्वा मुळे जगाला अस्तित्व आले आहे, ज्याच्या स्वरूपामुळे सर्व आनंदित आणि सुखी होतात, अशा त्या सच्चिदानंदरूप श्रीगुरुला नमस्कार असो.

यत्सत्येन जगत् सत्यं, यत् प्रकाशेन भाति तत् I

यदानन्देन नन्दन्ति, तस्मैश्री गुरवे नमः ll

yatsatyena jagat satyaṃ, yat prakāśena bhāti tat l

yadānandena nandanti, tasmaiśrī gurave namaḥ ll

37. ज्याच्या अस्तित्वामुळेच मानवजातीद्वारे हे जग अनुभवले जाते, सूर्य प्रकाशमान होतो आणि ज्याच्या स्वभावामुळे (प्रेम आणि करुणा) पुत्रादि सर्व प्रिय वाटतात अशा गुरूला नमस्कार असो. (याचा अर्थ असा आहे की मानवाकडून प्रेमाची अभिव्यक्ती हे मुळातच दैवीय आहे.)

यस्यस्थित्या सत्यमिदं, यद् भति भानुरूपतः l

प्रियं पुत्रादि यत् प्रीत्या, तस्मैश्री गुरवे नमः ll

yasyasthityā satyamidaṃ, yad bhati bhānurūpataḥ l

priyaṃ putrādi yat prītyā, tasmaiśrī gurave namaḥ ll

38. ज्याच्यामुळे हे जग गतिमान आणि चेतन स्वरूपाने अनुभवास येते, मानवी मनास देखील चेतना, सजीवता प्राप्त होते, आणि ज्याच्यामुळे जागृति, स्वप्न, सुषुप्ती ह्या तिन्ही अवस्था देखील गतीशील आणि चेतन स्वरूपाने मानवी मनास अनुभवास येतात अशा त्या गुरूला नमस्कार.

येन चेतयिते ह्दिं, चित्तं चेतयते न यम् l

जाग्रत् स्वप्न सुषुत्यादि, तस्मैश्री गुरवे नमः ll

yena cetayite hidaṃ, cittaṃ cetayate na yam l

jāgrat svapna suṣuptyādi, tasmaiśrī gurave namaḥ ll

39. ज्याने दिलेल्या ज्ञानामुळे आता (आत्म-साक्षात्कारानंतर) हे विश्व भिन्न अथवा भेदरूप दिसत नाही, अभेदयोग ज्याच्यामुळे साध्य होतो, अशा श्रीगुरुला नमस्कार असो.

यस्य ज्ञानादिदं विश्वं न दृश्यं भिन्न भेदतः ।

सदेक रूप रूपाय, तस्मैश्री गुरवे नमः ॥

yasya jñānādidaṃ viśvaṃ na dṛśyaṃ bhinna bhedataḥ I

sadeka rūpa rūpāya, tasmaiśrī gurave namaḥ II

40. ज्याच्या पवित्र शिक्षणामुळे, या सृष्टीबद्दल वैराग्य वृत्ती निर्माण झाली आहे आणि परिणामस्वरूप ती माझ्याशी भेदरूप दिसत नाही. अशा श्रीगुरुला नमस्कार असो.

यस्यामतं तस्यमतं, मतं यस्य न वेदं सः ।

अनन्य भाव भावाय, तस्मैश्री गुरवे नमः ॥

yasyāmataṃ tasyamataṃ, mataṃ yasya na vedaṃ saḥ I

ananya bhāva bhāvāya, tasmaiśrī gurave namaḥ II

41. या प्रकट विश्वाचे कारण असलेले, तसेच या ब्रह्मांडाचे तेजस्वरूप असणाऱ्या अशा कार्यकारणरूपी (जे कारणरूपातही आहेत आणि प्रकट रूपातही आहेत) गुरूला नमस्कार असो.

यस्य कारणरूपस्य, कार्यरूपेण भातियत् ।

कार्यकारण रूपाय, तस्मैश्री गुरवे नमः ॥

yasya kāraṇarūpasya, kāryarūpeṇa bhātiyat I

kāryakāraṇa rūpāya, tasmaiśrī gurave namaḥ II

42. नानारूपी ह्या विश्वात, कोठेही कसलीही भिन्नता नाही, केवळ कार्यकारणभावच आहे. विविधरूपे ही गुरुहून अभिन्न आहेत. अशा श्रीगुरुला नमस्कार. (असंख्य स्वरूपात असल्यासारखे दिसत असले तरी या जगामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये मूलभूत अभिन्नता आहे).

नानारूप मिदं सर्वं न केनाप्यस्ति भिन्नता ।

कार्यकारणता चैव तस्मैश्री गुरवे नमः ॥

nānārūpa midaṃ sarvaṃ na kenāpyasti bhinnatā I

kāryakāraṇatā caiva tasmaiśrī gurave namaḥ II

43. ज्यांचे चरणकमलयुगुल द्वैतवादाची (या प्रकट विश्वाच्या बाबतीत) धारणा दूर करू शकतात अशा श्रीगुरुला प्रणाम असो.

यदंघ्रि कमल द्वंद्वं, द्वन्द्वताप निवारकम् ।

तारकं सर्वदाऽऽपद्भ्यः श्रीगुरुं प्रणमाम्यहम् ॥

yadaṃghri kamala dvaṃdvaṃ, dvandvatāpa nivārakam I

tārakaṃ sarvadā''padbhyaḥ śrīguruṃ praṇamāmyaham II

44. भगवान शिव (संहारक रूपात) साधकावर रागावले तर गुरुभक्ताचा पाठीराखा गुरू असतो. तथापि, भगवान शिवदेखील या शिष्यांना गुरूच्या रागापासून वाचवू शकत नाहीत. म्हणून सर्वतोपरी गुरुशरणागति पत्करावी.

शिवे कृद्धे गुरुस्त्राता गुरौ कृद्धे शिवो न हि ।

तस्मात् सर्वप्रयत्नेन श्रीगुरुं शरणं व्रजेत् ll

śive kṛddhe gurustrātā gurau kṛddhe śivo na hi l

tasmāt sarvaprayatnena śrīguruṃ śaraṇaṃ vrajet ll

45. जे वाणी, मन, चित्त शक्ती दर्शवितात; जे कि श्वेत आणि रक्त म्हणजे पांढरा व तांबडा ह्यामुळे भिन्न आहेत आणि जे शिव आणि शक्ती स्वरूपात प्रकाशतात. अशा शिवशक्तीरूप श्रेष्ठ गुरुचरणांना मी वंदन करतो.

वंदे गुरुपद द्वंद्वं वाङ्मनश्चित्त गोचरम् l

श्वेत रक्तप्रभा भिन्नं, शिवशक्त्यात्मकं परम् ll

vaṃde gurupada dvaṃdvaṃ vāṅmanaścitta gocaram l

śveta raktaprabhā bhinnaṃ, śivaśaktyātmakaṃ param ll

46. "गुरु" या दोन अक्षरी ध्वनीत "गु" हा शब्द तीन गुणांच्या (जडत्व, गतिशीलता आणि समरसतेच्या) पलीकडे आहे आणि "रु" हा शब्द निराकार असल्याचे ओळखले जाते. जो कोणी या सत्याची शिकवण देऊ शकतो त्यालाच गुरू ही संज्ञा प्राप्त होते.

गुकारं च गुणातीतं, रुकारं रूप वर्जितं l

गुणातीत स्वरूपं च, यो दध्यात् स गुरुः स्मृतः ll

gukāraṃ ca guṇātītaṃ, rukāraṃ rūpa varjitaṃ l

guṇātīta svarūpaṃ ca, yo dadhyāt sa guruḥ smṛtaḥ ll

47. हे पार्वती! तीन नेत्र नसूनही जो सर्वसाक्षी शिवरूप आहे, चतुर्भुज नसूनही जो अच्युत, विष्णू आहे, चार मुखे नसतानाही जो ब्रह्मदेव आहे, असे पूजनीय गुरू हे त्रिमूर्तीचे (सृष्टीचे तीन पालनकर्ते, जीवन,निर्वाह आणि संहार) स्वरूप आहेत.

अ - त्रिनेत्र सर्वसाक्षी - अ – चतुर्भाहुरच्युतः ।

अ - चतुर्वदनो ब्रह्म, श्री गुरु कथित प्रिये ॥

a - trinetra sarvasākṣī - a – caturbhāhuracyutaḥ I

a - caturvadano brahma, śrī guru kathita priye II

48. आपल्या सर्वांगीण विकासासाठी आपण पूजनीय गुरूला नमन केले पाहिजे. पूजनीय गुरूंच्या आशीर्वादाने आपण जन्म आणि मृत्यूच्या या क्षणभंगुर जीवनातून मुक्त होऊ शकतो.

अयं मयांजलिर्बद्धो, दया सागरवृद्धये ।

यदनुग्रहतो जन्तुश्चित्र संसार मुक्तिभाक् ॥

ayaṃ mayāṃjalirbaddho, dayā sāgaravṛddhaye I

yadanugrahato jantuścitra saṃsāra muktibhāk II

49. श्रीगुरुचे सर्वोच्च आणि अमर गुण फक्त तीक्ष्ण बुद्धिमत्तेद्वारे (विवेकबुद्धीने) लक्षात घेणे शक्य आहे. परंतु आंधळ्यांना जसा सूर्योदय दिसू शकत नाही त्याप्रमाणे मंदभाग्य आणि धार्मिक गुणवत्तेविना असलेले जीव ह्या गुरुरूपाला पाहू शकत नाहीत. (तथापि, तीक्ष्ण बुद्धी देखील एखाद्या पूजनीय गुरूच्या कृपेने मनुष्याला मिळाली आहे.)

श्रीगुरोः परमं रूपम्, विवेक चक्षुषोऽमृतम् ।

मन्द भाग्या न पश्यन्ति अन्धाः सूर्योदयं यथा ll

śrīguroḥ paramaṃ rūpam, viveka cakṣuṣo'mṛtam l

manda bhāgyā na paśyanti andhāḥ sūryodayaṃ yathā ll

50. "श्री" म्हणजे शक्ती. "नाथ" म्हणजे पति अथवा भगवन! "श्रीनाथ" म्हणजे भगवान विष्णू (श्रींचे पती). ज्या दिशेला श्रीगुरुनाथांचे चरणयुगुल विराजमान झालेले असतात (भगवान विष्णूच्या रूपाने) त्या दिशेला प्रतिदिनी भक्तीपूर्वक नमस्कार करावा. हे पार्वती! श्रद्धा आणि भक्तीने अर्पित केलेले श्रद्धासुमन आपले विचार पवित्र करतात.

श्रीनाथ चरण द्वंद्वं यस्यां दिशे विराजिते l

तस्यै दिशे नमस्कुर्याद्, भक्त्या प्रतिदिनं प्रिये ll

śrīnātha caraṇa dvaṃdvaṃ yasyāṃ diśe virājite l

tasyai diśe namaskuryād, bhaktyā pratidinaṃ priye ll

51. जेथे भगवान सार्वभौम गुरुमहाराज विश्वाचा उदय, प्रलय, उत्पत्तिस्थितिरूपी घडामोडीचे नाटक नेहमी साक्षीभावाने बघत जागृत असतात त्या दिशेला नियमितपणे विशेष मंत्र आणि सुमनांनी वंदन केले पाहिजे.

तस्यै दिशे सततमंजलिरेष आर्ये

प्रक्षिप्यते, मुखरितो मधुपैर्बुधैश्च l

जागर्ति यत्र भगवान् गुरु चक्रवर्ती

विश्वोदय प्रळय नाटक नित्यसाक्षी ll

tasyai diśe satatamaṃjalireṣa ārye

prakṣipyate, mukharito madhupairbudhaiśca I

jāgarti yatra bhagavān guru cakravartī

viśvodaya pra̲laya nāṭaka nityasākṣī II

52. भगवान विष्णू आणि इतर दोन भगवान अर्थात त्रिमूर्ती, भगवान गणपती, शक्तीच्या तीन रूपांचे (सृष्टी उत्पत्ती, स्तिथी आणि प्रलय) आसन, भैरवाचे आठ रूप (भगवान शिवाचे एक स्वरूप), सिद्धांची सभा (योगाचे आराध्य), श्रीगुरुनाथांचे चरणयुगुल, चौसष्ट योगिनी, आणि “अ” या ध्वनीपासून प्रारंभ होऊन “क्ष” पर्यंत (संस्कृत वर्णमालेतली ५० अक्षरे) असणाऱ्या सर्व मंत्रांची माळा, अशा श्रीगुरुदेवांच्या मंडलाला मी नमस्कार करतो.

श्रीनाथादि गुरुत्रयं गणपतिं पीठत्रयं भैरवम्

सिद्धौघं बटुक त्रयं पादयुगं दूतीक्रमं मंडलं I

वीरान् द्वश्यष्ठ चतुष्कषष्ठि नवकं वीरावळी पंचकं

श्रीमन्मालिनी मंत्रराज सहितं वंदे गुरोर्मंडलम् II

śrīnāthādi gurutrayaṃ gaṇapatiṃ pīṭhatrayaṃ bhairavam

siddhaughaṃ baṭuka trayaṃ pādayugaṃ dūtīkramaṃ maṃḍalaṃ I

vīrān dvaśyaṣṭha catuṣkaṣaṣṭhi navakaṃ vīrāva̲lī paṃcakaṃ śrīmanmālinī maṃtrarāja sahitaṃ vaṃde gurormaṃḍalamII

53. प्राणायाम करण्याच्या विविध पद्धतींना हठयोग (फुफ्फुसे

भरल्यानंतर आंतरिकरित्या श्वास रोखणे, फुफ्फुसे रिक्त झाल्यानंतर श्वास रोखणे, “केवल कुंभक”, " भस्त्रिका”, “शीतली”, “भ्रामरी” इ.) म्हणतात. जरी प्राणायामचा सराव करणे शक्य आहे, तरीही हे दीर्घकाळापर्यंत केले जाणे आवश्यक आहे. शिवाय असंख्य पद्धती विकसित केल्या गेल्या आहेत. तथापि, जीवनशक्तीच्या सूक्ष्म वायूला रोखण्यासाठी वापरल्या जाणारे तंत्र दुर्दैवाचे जनक आहेत. शिवाय, त्यांचा सराव करणे देखील फार कठीण आहे. व्यवहारात कोणतीही अनियमितता किंवा विकृती झाल्यास वेदनादायक आजार उद्भवू शकतात (सिद्धांच्या देखरेखीखाली अभ्यास करणे अधिक सुरक्षित आहे). प्राणायामच्या अनियमित किंवा उच्छृंखल अभ्यासामुळे असाध्य आणि हानिकारक रोगांचा त्रास होईल.म्हणूनच, जर साधक जागरूक असतील आणि सतत एका श्रेष्ठ गुरुचीच सेवा करत असतील तर परिणाम अगदी सोप्या आणि नैसर्गिक मार्गाने मिळवू शकतात.

अभ्यस्तैः सकलैः सुदीर्घमनिलैर्व्याधि प्रदैर्दुष्करैः

प्राणायाम शतैरनेक करणैः दुःखात्मकैर्दुर्जयैः ।

यस्मिन्नभ्युदिते विनश्यति बलीवायुः स्वयं तत् क्षणात्

प्राप्तुं तत्सहजं स्वभावमनिशं सेवध्वमेकं गुरुम् ॥

abhyastaiḥ sakalaiḥ sudīrghamanilairvyādhi pradairduṣkaraiḥ prāṇāyāma śatairaneka karaṇaiḥ duḥkhātmakairdurjayaiḥ I

yasminnabhyudite vinaśyati balīvāyuḥ svayaṃ tat kṣaṇāt

prāptuṃ tatsahajaṃ svabhāvamaniśaṃ sevadhvamekaṃ gurum II

54. स्वरूप दर्शन घडविणाऱ्या गुरूच्या शरीराचे, मूर्तीचे चिंतन म्हणजे

अनन्त शिवाचेच ध्यान केल्याप्रमाणे होय. आपल्या गुरूचे नामसंकीर्तन म्हणजेही शिवाचेच स्तवन होय.

स्वदेशिकस्यैव शरीरचिंतनम्

भवेदनन्तस्य शिवस्य चिंतनम् ।

स्वदेशिकस्यैव च नामकीर्तनम्

भवेदनन्तस्य शिवस्य कीर्तनम् ॥

svadeśikasyaiva śarīraciṃtanam

bhavedanantasya śivasya ciṃtanam I

svadeśikasyaiva ca nāmakīrtanam

bhavedanantasya śivasya kīrtanam II

55. ज्याच्या चरणधुलीचा एक कण देखील संसारसमुद्र पार करणारा सेतू होतो अशा त्या गुरुनाथाची मी उपासना करतो.

यत्पादरेणु कणिका कापि संसार वारिधेः ।

सेतुबंधायते नाथं देशिकं तमुपास्महे ॥

yatpādareṇu kaṇikā kāpi saṃsāra vāridheḥ I

setubaṃdhāyate nāthaṃ deśikaṃ tamupāsmahe II

56. ज्याचा अनुग्रह प्राप्त झाल्याने महान अज्ञाननाश होतो अशा गुरुदेवांना आपल्या इष्ट विषयसिद्धीसाठी नमस्कार करावा.

यस्मादनुग्रहं लब्ध्वा महदज्ञान मुत्सृजेत् ।

तस्मै श्री देशिकेन्द्राय, नमाश्चाभीष्ठ सिद्धये ॥

yasmādanugrahaṃ labdhvā mahadajñāna mutsṛjet I

tasmai śrī deśikendrāya, namāścābhīṣṭha siddhaye II

57. श्रीगुरुदेवांचे चरणकमल सर्व संसारवणव्याला नष्ट करते. म्हणून, श्रीगुरुदेवांच्या चरणकमलाचे ध्यान करावे. ते ब्रह्मरंध्रामध्ये मस्तकात ताळूच्या ठिकाणी, चंद्रमंडलांतील श्वेतकमळाच्या मध्यभागी स्थितआहेत. (जे मस्तकाच्या शीर्षस्थानी आहे आणि जे ब्रम्हाचे प्रवेशद्वार आहे.)

पादाब्जं सर्व संसार, दावानल विनाशकम् I

ब्रह्मरन्द्रे सिताम्भोज, मध्यस्थं चन्द्र मंडले II

pādābjaṃ sarva saṃsāra, dāvānala vināśakam I

brahmarandre sitāmbhoja, madhyasthaṃ candra

maṃḍale II

58. हजार पाकळ्यांनी शोभणाऱ्या कमळाच्या (मस्तक मुकुटूच्या शीर्ष स्थानावर स्थित) "अ", "क", "ठ" या तीन ध्वनीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन पाकळ्या असतात. या तीन पाकळ्याच्या कमळाच्या वरील दोन्ही बाजूला हंसच्या शेजारी एक त्रिकोण देखील आहे. त्रिकोणाच्या केंद्रस्थ स्थित गुरूचे ध्यान करावे.

अकथादि त्रिरेखाब्जे, सहस्रदळ मंडले I

हंस पार्श्व त्रिकोणे च स्मरे त्तन्मध्यगं गुरुम् II

akathādi trirekhābje, sahasradaḻa maṃḍale I

haṃsa pārśva trikoṇe ca smare ttanmadhyagaṃ gurum II

59. श्रीगुरुची दिव्य दृष्टी नेहमी माझ्यावर राहो.त्या दृष्टीक्षेपामुळे सर्व जगाची निर्मिती होते आणि सर्व वेदांचे सार जाणून घेण्याची इच्छाशक्ती मजबूत होते.सांसारिक संपत्तीकडे असलेले आकर्षण कमी करते आणि लौकिक, ऐहिक ऐश्वर्याचे व्यर्थत्व शिकवते. त्याद्वारे, भक्ताच्या अवगुणांचे परिमार्जन होते.

सकल भुवन सृष्टिः कल्पिताऽशेष पुष्टिः

निखिल निगम दृष्टिः संपदां व्यर्धदृष्टिः ।

अवगुण परिमार्ट्र्षि? स्तत्पदार्धैक दृष्टिः

भवगुण परमेष्टिर्मोक्ष मार्गैक दृष्टिः ॥

sakala bhuvana sṛṣṭiḥ kalpitā'śeṣa puṣṭiḥ

nikhila nigama dṛṣṭiḥ saṃpadāṃ vyardhadṛṣṭiḥ I

avaguṇa parimārtṣi? statpadārdhaika dṛṣṭiḥ

bhavaguṇa parameṣṭirmokṣa mārgaika dṛṣṭiḥ II

60. श्रीगुरुची दृष्टी हि जगाच्या रंगमंचाच्या स्थापनेचा एक आधारस्तंभ आहे, जी कारुण्याची, स्नेहाची प्रेमरसाची वृष्टी करणारी आहे. सृष्टी, उत्क्रांती आणि विघटन या तिन्ही घटनांचा गुरुंच्या दृष्टीक्षेपात समावेश आहे.गुरुची दृष्टी ही तिन्ही काळाचा (भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ) जनक आहे आणि ब्रम्ह त्रिगुणाची (परम सत्य, परम ज्ञान, आणि परम आनंद) प्राप्ती देणारी आहे. अशी श्रीगुरुची दिव्य दृष्टी नेहमी माझ्यावर राहो.

सकल भुवन रंग स्थापना स्तम्भयष्टि

सकरुण रसवृष्टि स्तत्वमाला समष्टिः ।

सकल समयसृष्टिः सच्चिदानंद दृष्टिः

रिवसतु मयि नित्यं श्रीगुरोर्दिव्य दृष्टिः ll

sakala bhuvana raṃga sthāpanā stambhayaṣṭi

sakaruṇa rasavṛṣṭi statvamālā samaṣṭiḥ l

sakala samayasṛṣṭiḥ saccidānaṃda dṛṣṭiḥ

rivasatu mayi nityaṃ śrīgurordivya dṛṣṭiḥ ll

61. गुरूने दिलेला मंत्र किंवा “गुरु” हा शब्द सर्व मंत्रांमध्ये राजा आहे. ज्वालाग्नीने शुद्ध केलेल्या सुवर्णांप्रमाणे आहे. हा मंत्रराज निरंतर, रात्रंदिवस मृत्यूपासून आमचे रक्षण करतो.

अग्निशुद्ध समंतात् ज्वाला परिचिकाधिया l

मंत्रराजमिमं मन्येऽहर्निशं पातु मृत्युतः ll

agniśuddha samaṃtāt jvālā paricikādhiyā l

maṃtrarājamimaṃ manye'harniśaṃ pātu mṛtyutaḥ ll

62. सच्चिदानंदस्वरूप गुरुतत्त्व किंवा “गुरु” शब्दाचे सारकिंवा “गुरु” मंत्राचे सार गतिशील आहे, अचलही आहे. तो दूर आहे, जवळ पण आहे. सर्वांच्या अंतरी आहे, तसाच बाहेरही आहे. सर्वव्यापी गुरुत्वाचे वर्णन सीमित बुद्धीने करणे हे केवळ अशक्यच आहे.

तदेजति तन्नैजति, तद् दूरे तत् समीपके l

तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्य बाह्यतः ll

tadejati tannaijati, tad dūre tat samīpake l

tadantarasya sarvasya tadu sarvasya bāhyataḥ ll

63 - 65. मी स्वतः गुरुचेतना आहे जी याप्रमाणे आहे : मी आत्मा जन्मरहित आहे, मला वृद्धत्व नाही, मला स्वतःला आदि अंत नाही, मी ज्ञानमय, आनंदमय आहे, अणूहून लहान आणि मोठ्याहून मोठा आहे, माझा पूर्व-इतिहास नाही (मी नेहमी अस्तित्त्वात आहे), मी चिरंतन आहे, मी स्वयंप्रकाशी आहे, मी विकाररहित आहे, मी सर्वजगव्यापी आहे, मी सदा आनंदमय आहे, मी ध्रुव (उत्तरी ध्रुवीय तारा) तारा आहे , मी अविनाशी आहे, तसेच ज्ञान प्राप्त करण्याचे मौखिक परंपरा, प्रत्यक्ष प्रमाण, इतिहास आणि अनुमान हे चारही मार्ग देखील मीच आहे.

अजोऽहमजरोहं(ऽ)च अनादिनिधनः स्वयम् I

अविकारश्चिदानंद, अणीयान् महतो महन् II

अपूर्वाणां परं नित्यं स्वयं ज्योतिर्निरामयम् I

विरजं परमाकाशं ध्रुवमानंदमव्ययम् II

शृतिः प्रत्यक्षमैतिह्य – मनुमानश्चतुष्टयम् I

यस्य चात्मतपोवेद, देशिकं च सदा स्मरेत् II

ajo'hamajaroham(')ca anādinidhanaḥ svayam I

avikāraścidānaṃda, aṇīyān mahato mahan II

apūrvāṇāṃ paraṃ nityaṃ svayaṃ jyotirnirāmayam I

virajaṃ paramākāśaṃ dhruvamānaṃdamavyayam II

śṛtiḥ pratyakṣamaitihya – manumānaścatuṣṭayam I

yasya cātmatapoveda, deśikaṃ ca sadā smaret II

66. हे महामते! (देवी पार्वती!) माझ्यासमोर बसलेल्या तुझ्यातील साधुत्व बघून एखाद्या गुरूची उपासना कशी करावी हे मी आपणास सांगेन.

मननं यद्भवं कार्यं तद्वदामि महामते ।

साधुत्वं च मया दृष्ट्वा त्वयि तिष्ठति सांप्रतम् ॥

mananaṃ yadbhavaṃ kāryaṃ tadvadāmi mahāmate I

sādhutvaṃ ca mayā dṛṣṭvā tvayi tiṣṭhati sāṃpratam II

67. पूजनीय गुरूंना अभिवादन, ज्यांच्या कृपेने दैवीयतेचे ज्ञान प्रकट झाले जे संपूर्ण पृथ्वी आणि सर्व प्राण्यांना प्रभावित करते.

अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।

तत्पदं दर्शितं येन, तस्मै श्री गुरवे नमः ॥

akhaṃḍamaṃḍalākāraṃ vyāptaṃ yena carācaram I

tatpadaṃ darśitaṃ yena, tasmai śrī gurave namaḥ II

68. ज्याचे चरणकमल सर्व वेदांच्या मुकुटमणीरूप महावाक्यांनी सुशोभित आहे, जो वेदांतरूपी कमळाला विकसित करणारा जणू सूर्यच आहे, अशा श्रीगुरुला नमस्कार असो.

सर्वशृति शिरोरत्न विराजित पदाम्बुजः ।

वेदान्ताम्बुज सूर्यो यः स्तस्मै श्री गुरवे नमः ॥

sarvaśṛti śiroratna virājita padāmbujaḥ I

vedāntāmbuja sūryo yaḥ stasmai śrī gurave namaḥ II

69. ज्याचे केवळ स्मरण केले असता आपोआप ज्ञान उत्पन्न होते, ज्यांचे नुसते स्मरण केल्यास सर्व प्रकारच्या संपत्ती मिळू शकतात, त्या श्रीगुरुला नमस्कार असो.

यस्यस्मरण मात्रेण, ज्ञानमुत्पद्यते स्वयम् I

य एव सर्वसंप्राप्ति तस्मै श्री गुरवे नमः II

yasyasmaraṇa mātreṇa, jñānamutpadyate svayam I

ya eva sarvasaṃprāpti tasmai śrī gurave namaḥ II

70. जो चैतन्यस्वरूप, शाश्वत, शांत, अमर्यादित, निर्मल, आणि जो " ओम " ची तीन (नाद, बिंदू आणि कला) रूपांच्या पलीकडे आहे अशा श्रीगुरुला, गुरुतत्वाला नमस्कार असो.

चैतन्यं शाश्वतं शान्तं व्योमातीतं निरंजनम् I

नादबिन्दु कळातीतं, तस्मै श्री गुरवे नमः II

caitanyaṃ śāśvataṃ śāntaṃ vyomātītaṃ niraṃjanam I

nādabindu kaḻātītaṃ, tasmai śrī gurave namaḥ II

71. चर आणि अचर, सजीव-निर्जीव असे सर्व जग ज्याने व्यापले आहे, त्या श्रीगुरुला नमस्कार असो.

स्थावरं जंगमंचैव तधाचैव चराचरम् I

व्याप्तं येन जगत् सर्वं, तस्मै श्री गुरवे नमः II

sthāvaraṃ jaṃgamaṃcaiva tadhācaiva carācaram I

vyāptaṃ yena jagat sarvaṃ, tasmai śrī gurave namaḥ II

72. ३६ तत्वांनी (किंवा सांख्य तत्त्वज्ञानानुसार 36 गुणांनी या विश्वाची रचना केली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा प्रणालींपैकी एक) अलंकृत असलेला, भुक्ति व मुक्ति, भोग व मोक्ष देणाऱ्या श्रीगुरुला नमस्कार.

ज्ञानशक्ति समारूढ स्तत्व मालाविभूषितः ।

भुक्तिमुक्ति प्रदाताय, तस्मै श्री गुरवे नमः ॥

jñānaśakti samārūḍha statva mālāvibhūṣitaḥ I

bhuktimukti pradātāya, tasmai śrī gurave namaḥ II

73. आपल्या आत्मज्ञानाच्या (किंवा आत्म-साक्षात्काराच्या) प्रभावाने, जन्मोजन्मी (शिष्याद्वारे) साठविलेल्या सर्व संचित कर्माचे भस्म करणाऱ्या श्रीगुरुला नमस्कार असो.

अनेक जन्म संप्राप्त सर्वकर्म विदाहिने ।

स्वात्म ज्ञान प्रभावेण, तस्मै श्री गुरवे नमः ॥

aneka janma saṃprāpta sarvakarma vidāhine I

svātma jñāna prabhāveṇa, tasmai śrī gurave namaḥ II

74. गुरुतत्त्व सर्वश्रेष्ठ होय, गुरुहून वरचढ दुसरे काही नाही. गुरुसेवा आणि गुरुभक्तीहून श्रेष्ठ असे दुसरे ध्यान किंवा तप नाही. तत्त्वज्ञानापेक्षा दुसरे कोणतेही ज्ञान श्रेष्ठ नाही. अशा श्रेष्ठ गुरूला नमस्कार असो जे या विश्वाच्या निर्मितीद्वारे तयार झालेल्या सर्व गोष्टींचे सार आहेत.

न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः I

तत्त्व ज्ञानात् परं नास्ति, तस्मै श्री गुरवे नमः II

na guroradhikaṃ tattvaṃ na guroradhikaṃ tapaḥ I

tattva jñānāt paraṃ nāsti, tasmai śrī gurave namaḥ II

75. माझे गुरुनाथ सर्व जगाचेच नाथ, स्वामी, मालक आहेत. माझे गुरू तिन्ही जगाचे (प्रकट संसाराचे तीन स्तर अर्थातच स्वर्गलोक, भूलोक, पाताळलोक) गुरू आहेत. माझा आत्मा सर्वव्यापी म्हणजेच सर्वांभूती असणारा आत्मा आहे. अशा प्रकारचा अनुभव आणून देणाऱ्या श्रीगुरुला नमस्कार असो.

मन्नाथः श्रीजगन्नाथो, मद्गुरुस्त्रिजगद्गुरुः I

ममात्मा सर्वभूतात्मा, तस्मै श्री गुरवे नमः II

mannāthaḥ śrījagannātho, madgurustrijagadguruḥ I

mamātmā sarvabhūtātmā, tasmai śrī gurave namaḥ II

76. ध्यानाचे आधारस्थान गुरुमूर्ती होय. पूजेचे मूलस्थान गुरुचरण, मंत्राचे उगमस्थान गुरुवाक्य, मोक्षाचा (मुक्ति किंवा आत्मज्ञान किंवा ब्रम्ह किंवा सर्वशक्तिमान ज्ञान) मूलाधार गुरूची कृपा होय.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् I

मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोः कृप II

dhyānamūlaṃ gurormūrtiḥ pūjāmūlaṃ guroḥ padam I

maṃtramūlaṃ gurorvākyaṃ, mokṣamūlaṃ guroḥ kṛpa II

77. गुरु आदि, प्रथमपासून आहे, सर्वांचे मूळ उगमस्थान आहे. पण गुरूला स्वतःला दुसरे उगमस्थान नाही. (गुरुतत्त्व स्वयंभू आहे.) गुरुच परम दैवत. गुरुहून दुसरे श्रेष्ठ काही नाही. अशा श्रीगुरुला नमस्कार असो.

गुरुरादिरानादिश्च गुरुपरम दैवतम् ।

गुरोः परतरं नास्ति, तस्मै श्री गुरवे नमः ॥

gururādirānādiśca guruparama daivatam I

guroḥ parataraṃ nāsti, tasmai śrī gurave namaḥ II

78. सातही सागरापर्यंतच्या तीर्थस्थानादिकांचे फल एका गुरुचरणतीर्थाच्या बिंदूच्या हजाराव्या भागाच्या अंशातही दुर्लभ नाही. गुरूच्या चरणतीर्थात सात समुद्रात स्नान केल्याचे फळ मिळते, इतकें गुरुचरणतीर्थ श्रेष्ठ आहे.

सप्तसागर पर्यन्तं, तीर्थस्नानादिकं फलम् ।

गुरोरंघ्रिपयोबिन्दु, सहस्रांशेन दुर्लभम् ॥

saptasāgara paryantaṃ, tīrthasnānādikaṃ phalam I

guroraṃghripayobindu, sahasrāṃśena durlabham II

79. भगवान विष्णू किंवा भगवान शिवचा कोप झाला तर गुरू भक्ताचे रक्षण करतो. पण गुरुच रुष्ट झाला तर भक्ताला कोणी त्राता नाही. म्हणून सर्व प्रयत्नांनी गुरूला शरण जावे.

हरौरुष्टे गुरुस्त्राता गुरोरुष्टेन कश्चन ।

तस्मात् सर्व प्रयत्नेन श्रीगुरुं शरणं व्रजेत् ll

harauruṣṭe gurustrātā guroruṣṭena kaścana l

tasmāt sarva prayatnena śrīgurum śaraṇaṃ vrajet ll

80. सर्व जगत् ब्रह्मा, भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या सामर्थ्याने व्यापलेले आहे (अनुक्रमे उत्पत्ती, स्तिथी आणि प्रलय यांचे सामर्थ्य असणाऱ्या देवांचे त्रिमूर्ती). ब्रह्माविष्णुशिवस्वरूप हे विश्व गुरुचे तत्व किंवा “गुरुचे सार” होय. गुरूहून श्रेष्ठ दुसरा कोणी नाही, दुसरे काही नाही. म्हणून गुरूची उत्तम प्रकारे मनःपूर्वक पूजा करावी.

गुरुरेव जगत् सर्वं, ब्रह्मविष्णु शिवात्मकम् l

गुरोः परतरं नास्तितस्मात् संपूज येद् गुरुम् ll

gurureva jagat sarvaṃ, brahmaviṣṇu śivātmakam l

guroḥ parataraṃ nāstitasmāt saṃpūja yed gurum ll

81. गुरुभक्ति केल्याने साक्षात्काराच्या अनुभवासह आत्मज्ञान प्राप्त होते. गुरुहून दुसरा कोणी श्रेष्ठ नाही. म्हणून सिद्धयोग मार्गातील गुरुभक्तांनी गुरुचेच चिंतन करावे.

ज्ञानं विज्ञान सहितं, लभ्यते गुरुभक्तितः l

गुरोः परतरंनास्ति, ध्येयोऽसौ गुरुमार्गिभिः ll

jñānaṃ vijñāna sahitaṃ, labhyate gurubhaktitaḥ l

guroḥ parataraṃnāsti, dhyeyo'sau gurumārgibhiḥ ll

82. गुरु “तत्व” यापेक्षा श्रेष्ठ काहीही नाही. पवित्र शास्त्रसुद्धा गुरु “तत्व” काय आहे हे ‘हे नव्हे’, ‘हे नव्हे’ वगैरे घोषित करून त्यानंतर शांत राहिले. (याचा अर्थ असा आहे की धर्मग्रंथ फक्त “हे नाही” या शब्दाची घोषणा करून गुरु “तत्व” काय आहेत हे समजावून सांगू शकतो. गुरु “तत्व” म्हणजे नेमके काय आहे हे समजावणे पवित्र धर्मग्रंथांच्या क्षमतेच्या पलीकडे आहे.) अशा महत्तम गुरूची मनाने, वाणीने नित्य आराधना करणे हीच साधकाची साधना होय.

यस्मात् परतरं नास्ति, नेतिनेतीति वै शृतिः ।

मनसा वचसा चैव, नित्यमाराधयेद् गुरुम् ॥

yasmāt parataraṃ nāsti, netinetīti vai śṛtiḥ I

manasā vacasā caiva, nityamārādhayed gurum II

83. गुरूच्या कृपाप्रसादानेच ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या तीन देवता सृष्टीची उत्पत्ति, स्थिती व संहाराचे आपापले कार्य करण्यास समर्थ होतात.

गुरोः कृपाप्रसादेन, ब्रह्मविष्णु सदाशिवाः ।

समर्थाः प्रभवादौ च, कैवल्यं गुरुसेवया ॥

guroḥ kṛpāprasādena, brahmaviṣṇu sadāśivāḥ I

samarthāḥ prabhavādau ca, kaivalyaṃ gurusevayā II

84. देव, किन्नर, गंधर्व, पितर, यक्ष-चारण व मुनिजन देखील गुरुसेवेचा विधी जाणत नाहीत.

देव किन्नर गन्धर्वाः पितरोयक्षचारणाः ।

मुनयोऽपि न जानन्ति, गुरुशुश्रूषणे विधिम् ll

deva kinnara gandharvāḥ pitaroyakṣacāraṇāḥ I

munayo'pi na jānanti, guruśuśrūṣaṇe vidhim II

85-86. देव, गंधर्व, किन्नर, पितर, यक्ष, ॠषी आणि सिद्ध देखील जर गुरुसेवेकडे तोंड फिरवून असतील, गुरुसेवा त्यांच्या हातून होत नसेल तर कधीही मुक्त होऊ शकत नाहीत. अशा सर्व व्यक्ती सामान्यत: त्यांच्या प्राप्त झालेल्या अध्यात्मिक सामर्थ्यामुळे अहंकारी असतात आणि त्यामुळेच पूज्य गुरूची सेवा करण्यासंबंधी हे सत्य ते समजण्यास अक्षम असतात. परिणामी, जन्म, मृत्यू आणि पुनर्जन्म असलेल्या जीवनाच्या महासागरात गटांगळ्या खातात. पवनचक्कीच्या भांड्यातल्या पाण्याप्रमाणे त्यांचे सर्व तप (ध्यान) वाया जातात.

महाहंकार गर्वेण, तपोविद्या बलान्विताः l

संसार कुहरावर्ते, घटयंत्रे यथाघटाः ll

न मुक्ता देवगन्धर्वाः पितरोयक्ष किन्नराः l

ऋषयः सर्वसिद्धाश्च गुरुसेवा पराग् मुखाः ll

mahāhaṃkāra garveṇa, tapovidyā balānvitāḥ I

saṃsāra kuharāvarte, ghaṭayaṃtre yathāghaṭāḥ II

na muktā devagandharvāḥ pitaroyakṣa kinnarāḥ I

ṛṣayaḥ sarvasiddhāśca gurusevā parāg mukhāḥ II

87. हे महादेवि, सर्व प्रकारचा आनंद देणारे, सर्व प्रकारचे सुख प्रदान करणारे, भुक्ति व मुक्ति, भोग व मोक्ष इ. सहजसाध्य करण्याचे साधन

म्हणजे गुरुध्यान करण्याची पद्धत काळजीपूर्वक ऐका.

ध्यानं शृणु महादेवि, सर्वानंद प्रदायकम् ।

सर्वसौख्यकरं नित्यं, भुक्ति मुक्ति विधायकम् ॥

dhyānaṃ śṛṇu mahādevi, sarvānaṃda pradāyakam I

sarvasaukhyakaraṃ nityaṃ, bhukti mukti vidhāyakam II

88. मी श्रीमत् परब्रह्मगुरुचे स्मरण करतो, श्रीमत् परब्रह्मरूप गुरूचे स्तवन करतो, श्रीमत्परब्रह्मगुरुला नमन करतो, श्रीमत्परब्रह्मगुरुची मी उपासना करतो.

श्रीमत्परब्रह्म गुरुंस्मरामि, श्रीमत्परब्रह्म गुरुंवदामि ।

श्रीमत्परब्रह्म गुरुंनमामि, श्रीमत्परब्रह्म गुरुंभजामि ॥

śrīmatparabrahma guruṃsmarāmi, śrīmatparabrahma

guruṃvadāmi I

śrīmatparabrahma guruṃnamāmi, śrīmatparabrahma

guruṃbhajāmi II

89. ब्रह्मानंदरूपी, परमसुखदाता, केवळ ज्ञानस्वरूप (सर्वसमर्थाचा एक गुण), सुखदुःखादि द्वंद्वरहित, आकाशासारखा निर्लेप, तत्त्वमसि (म्हणजे आपण स्वतःच ते सर्वशक्तिमान आहात ज्यांचा तुम्ही शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहात) आदि महावाक्यांचे साध्य, एक, नित्य, विमल, निश्चल, सर्व प्राण्यांच्या बुद्धीचा साक्षी, भावातीत, त्रिगुणरहित (गतिशील, स्थिर आणि संतुलित पैलूंचे प्रतिनिधित्व करणारे राज, तमस आणि सात्विक) अशा सद्गुरूला मी नमस्कार करतो.

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्

द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ।

एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षी भूतम्

भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरुं तं नमामि ॥

brahmānaṃdaṃ paramasukhadaṃ kevalaṃ jñānamūrtim

dvaṃdvātītaṃ gagana sadṛśaṃ tattvamasyādi lakṣyam I

ekaṃ nityaṃ vimalamacalaṃ sarvadhī sākṣī bhūtam

bhāvātītaṃ triguṇa rahitaṃ sadguruṃ taṃ namāmi II

90. नित्य शुद्ध, ज्याचे स्वरूप किंवा पैलू शारीरिक डोळ्यांनी दिसू शकत नाहीत - आभासरहित, निराकार (ज्याचा आकार व रूप नाही), निरंजन, नित्य, बोधस्वरूप, चिदानन्दरूप, परब्रह्म (सर्वव्यापी देवत्व) श्रीगुरुला मी नमस्कार करतो.

नित्यं शुद्धं निराभासं, निराकारं निरंजनम् ।

नित्यबोधं चिदानंदं, गुरुंब्रह्म नमाम्यहम् ॥

nityaṃ śuddhaṃ nirābhāsaṃ, nirākāraṃ niraṃjanam I

nityabodhaṃ cidānaṃdaṃ, guruṃbrahma namāmyaham II

91. आपण चंद्राप्रमाणे आल्हाददायक असलेल्या पूज्य गुरूच्या त्या दिव्य स्वरुपाचे मनन करूया, ज्याच्या हातात एक पुस्तक, ज्ञानाचे प्रतीक आहे आणि दुसरा हात इच्छित वरदान देण्याच्या पवित्रामध्ये राहतो आणि शेवटी हृदयरूपी कमळाच्या देठांत मध्यभागी हृदयसिंहासनावर दिव्यमूर्तिरूप विराजमान झालेले आहेत. (म्हणजे गुरु

शिष्याच्या अगदी मनामध्ये विराजमान आहे).

हृदम्बुजे कर्णिक मध्य संस्थे सिंहासने संस्थित दिव्यमूर्तिम् ।

ध्यायेद् गुरुं चन्द्रकळा प्रकाशम् चित् पुस्तकाभीष्ट वरं दधानम् ॥

hṛdambuje karṇika madhya saṃsthe siṃhāsane saṃsthita divyamūrtim I

dhyāyed guruṃ candrakal̤ā prakāśam cit pustakābhīṣṭa varaṃ dadhānam II

92-93. श्वेत वस्त्र नेसलेली, श्वेत पुष्पे धारण केलेली, श्वेत मोत्यांच्या अलंकारानी अलंकृत, भूषित झालेली, आनंदाने परिपूर्ण दोन नेत्र असलेली, जिच्या डाव्या मांडीवर दिव्य आदिशक्ति स्थानापन्न झालेली आहे अशी, मंदस्मित करणारी, अती विपुल कृपेचा साठा, आनंदस्वरूप, आनंददाता, प्रसन्नमुख, ज्ञानस्वरूप, आत्मबोधयुक्त, योगीश्वर, स्तुती करण्यास योग्य, संसाररूपी रोगावर रामबाण औषध देणारा वैद्य, अशा श्रीगुरुला मी नित्य नमस्कार करतो.

श्वेताम्बरं श्वेतविलेप पुष्पं, मुक्ता विभूषं मुदितं द्विनेत्रम् ।

वामांक पीठस्थित दिव्यशक्तिं, मंदस्मितं सान्द्र कृपानिधानम् ॥

आनंदमानंदकरं प्रसन्नं, ज्ञानस्वरूपं निजबोधयुक्तम् ।

योगीन्द्रमीड्यं भवरोगवैद्यं, श्रीमद् गुरुं नित्यमहं नमामि ॥

śvetāmbaraṃ śvetavilepa puṣpaṃ, muktā vibhūṣaṃ muditaṃ dvinetram I

vāmāṃka pīṭhasthita divyaśaktiṃ, maṃdasmitaṃ sāndra kṛpānidhānam II

ānaṃdamānaṃdakaraṃ prasannaṃ, jñānasvarūpaṃ nijabodhayuktam I

yogīndramīḍyaṃ bhavarogavaidyaṃ, śrīmad guruṃ nityamahaṃ namāmi II

94. ज्याच्या ठिकाणी उत्पत्ति, स्थिति, लय, निग्रह आणि अनुग्रहरूप ही पाच गुण आहेत, त्या गुरूला मी नमस्कार करतो.

यस्मिन्सृष्टि स्थिति ध्वंस, निग्रहानुग्रहात्मकम् ।

कृत्यं पंचविधं शश्वत्, भासते तं नमाम्यहम् ॥

yasminsṛṣṭi sthiti dhvaṃsa, nigrahānugrahātmakam I

kṛtyaṃ paṃcavidhaṃ śaśvat, bhāsate taṃ namāmyaham II

95. प्रातःसमयी मस्तकातील भुवयांच्या मधोमध असलेल्या श्वेत कमळ धारण करणाऱ्या, दोन नेत्र आणि दोन भुजा असलेल्या, आशीर्वाद आणि अभय देणाऱ्या शांत स्वरूप गुरूचे नामोच्चार करून स्मरण करावे.

प्रातः शिरसि शुक्लाब्जे, द्विनेत्रं द्विभुजं गुरुम् ।

वराभययुतं शान्तं, स्मरेत्तं नामपूर्वकम् ॥

prātaḥ śirasi śuklābje, dvinetraṃ dvibhujaṃ gurum I

varābhayayutaṃ śāntaṃ, smarettaṃ nāmapūrvakam II

96. गुरुहून श्रेष्ठ काही नाही, काही नाही, काही नाही; हेच शिवाचे निश्चयपूर्वक सांगणे होय, ही भगवान शिवांची शिकवण आहे, ही

भगवान शिवची घोषणा आहे आणि शेवटी, हीच भगवान शिवची दिव्य इच्छा आहे.

नगुरोरधिकं नगुरोरधिकं, नगुरोरधिकं नगुरोरधिकम् ।

शिवशासनतः शिवशासनतः शिवशासनतः शिवशासनतः ॥

naguroradhikaṃ naguroradhikaṃ, naguroradhikaṃ

naguroradhikam I

śivaśāsanataḥ śivaśāsanataḥ śivaśāsanataḥ

śivaśāsanataḥ II

97. मी (भगवान शिव, येथे ज्याअर्थी देवी पार्वतीला ही शिकवण देत असल्याने) आणि पूज्य गुरू यांच्यात काही फरक नाही. ही माझी दिव्य इच्छा आहे, ही माझी आज्ञा आहे आणि हा माझा संदेश आहे.

इदमेव शिवंत्विदमेव शिवं त्विदमेवशिवं त्विदमेवशिवम् ।

मम शासनत˜˚ ममशासनत˜˚, ममशासनत˜˚, ममशासनतः ॥

idameva śivaṃtvidameva śivaṃ tvidamevaśivaṃ tvidamevaśivam I

mama śāsanata mamaśāsanata, mamaśāsanata, mamaśāsanataḥ II

98. अशा प्रकारे गुरुध्यान केल्यावर (मजकुराच्या वरील भागामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे) शिष्याच्या ठायी आत्मज्ञान आपोआपच उत्पन्न होते. (हा आत्मज्ञानाचा एक विशेष गुण आहे. ते आपोआपच उत्पन्न

होते. ह्या ज्ञानापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे काहीच नसल्याने बुद्धी त्याला समजू शकत नाही.)

एवं विधं गुरुं ध्यात्वा, ज्ञानमुत्पद्यते स्वयम् ।

तत्सद् गुरुप्रसादेन, मुक्तोऽहमिति भावयेत् ॥

evaṃ vidhaṃ guruṃ dhyātvā, jñānamutpadyate svayam l

tatsad guruprasādena, mukto'hamiti bhāvayet ll

99. गुरुने दाखविलेल्या मार्गाने साधना करून चित्तशुद्धी, मनःशुद्धि करून घ्यावी. अनित्य गोष्टींचे, मायेचे, अनात्म्याचे खंडन करावे आणि ती नाकारली पाहिजे (त्या मनातून कायमचे काढून टाकल्या पाहिजेत).

गुरुदर्शितमार्गेण, मनः शुद्धिं तु कारयेत् ।

अनित्यं खंडयेत् सर्वं, यत्किंचिदात्मगोचरम् ॥

gurudarśitamārgeṇa, manaḥ śuddhiṃ tu kārayet l

anityaṃ khaṃḍayet sarvaṃ, yatkiṃcidātmagocaram ll

100. ज्ञेय म्हणजे जे जाणून घ्यायचे किंवा मन जे स्वतः सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतो ते परिपूर्ण ज्ञानाचेच स्वरूप असते आणि मनाला जो हेतू सिद्ध करावयाचा आहे ते देखील परिपूर्ण ज्ञानच असते. म्हणजेच कार्य आणि कारण एकच आहेत हे समजणे आवश्यक आहे. जोपर्यंत या सत्याची जाणीव होत नाही तोपर्यंत आत्म-साक्षात्कार होत नाही. ह्याहून मुक्ति किंवा मोक्ष प्राप्त करण्याचा दुसरा मार्ग नाही.

ज्ञेयं सर्वस्वरूपंच, ज्ञानं च मन उच्यते ।

ज्ञानं ज्ञेयसमं कुर्यात्, नान्यः पन्था द्वितीयकः ॥

jñeyaṃ sarvasvarūpaṃca, jñānaṃ ca mana ucyate I

jñānaṃ jñeyasamaṃ kuryāt, nānyaḥ panthā dvitīyakaḥ II

101. हे गुरुमहात्म्य ऐकूनही जो गुरूची निंदा करील तो, जोपर्यंत चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत म्हणजे जगाच्या अंतापर्यंत घोर नरकात जाऊन पडेल.

एवं शृत्वा महादेवी, गुरुनिन्दां करोति यः ।

सयाति नरकं घोरं यावचन्द्र दिवाकरौ ॥

evaṃ śṛtvā mahādevī, gurunindāṃ karoti yaḥ I

sayāti narakaṃ ghoraṃ yāvacandra divākarau II

102. जरी मनुष्यास संसार चक्रात अनेकदा जन्म घ्यावा लागला असेल तर प्रत्येक वेळी मनुष्यास अंतकाळी पूजनीय गुरुचे स्मरण झाले पाहिजे. त्यात उणीव नको. जरी एखादा शिष्य किंवा योगाचा अभ्यास करणाऱ्यांना साक्षात्काराचा अनुभव आल्याने पूजनीय गुरूच्या नियंत्रणापासून मुक्त केले गेले तरीही गुरूचे स्मरण चुकवू नये.

यावत् कल्पान्तको देहस्तावदेव गुरुं स्मरेत् ।

गुरुलो पो न कर्तव्यः, स्वच्छन्दो यदि वा भवेत् ॥

yāvat kalpāntako dehastāvadeva guruṃ smaret I

gurulo po na kartavyaḥ, svacchando yadi vā bhavet II

103. शहाण्या बुद्धिमान शिष्याने गुरुसमोर हुंकार देऊन, (हुं, अं, हो, हां म्हणत, जो अनादर दाखवण्याचा आणि निरुपयोगी असल्याचे दर्शवितो) एकेक्षरी बोलू नये. नीट शब्दोच्चार करून बोलावे. तसेच गुरुसमोर असत्य भाषण करू नये.

हुंकारेण न वक्तव्यं, प्राज्ञैः शिष्यैः कथञ्चन ।

गुरोरग्रे न वक्तव्य, मसत्यं च कदाचन ॥

huṃkāreṇa na vaktavyaṃ, prājñaiḥ śiṣyaiḥ kathañcana I

guroragre na vaktavya, masatyaṃ ca kadācana II

104. आदरणीय गुरूशी अहंकार किंवा रागाने कधीही “तू”, "हुं" अशा एकरी शब्दात बोलू नये. त्याचप्रमाणे, एखाद्या व्यक्तीने शाब्दिक संभाषणात विजयी व्हावे या उद्देशाने पूजनीय गुरूशी कधीही वाद घालू नये. जर कोणी या नियमांचे पालन करीत नसेल तर ती व्यक्ती निर्जल अरण्यात ब्रह्मराक्षस म्हणून जन्माला येईल.

गुरु'त्वं' कृत्यहुं - कृत्य, गुरुं निर्जित्य वादतः ।

अरण्येनिर्जलेदेशे स भवेत् ब्रह्म राक्षसः ॥

guru'tvaṃ' kṛtyahuṃ - kṛtya, guruṃ nirjitya vādataḥ I

araṇyenirjaledeśe sa bhavet brahma rākṣasaḥ II

105. हे पार्वती, मुनि, नाग, सर्प किंवा देवदेवतांनी जरी शापिले तरी त्या शापापासून, अकाली मृत्यू ह्यांच्या भयापासून गुरू रक्षण करतो.

मुनिभिः पन्नगैर्वाऽपि सुरैर्वा शापितो यदि ।

कालमृत्यु भयाद्वापि, गुरुरक्षति पार्वति ॥

munibhiḥ pannagairvā'pi surairvā śāpito yadi I

kālamṛtyu bhayādvāpi, gururakṣati pārvati II

106. जे दैवीय आत्म्याप्रमाणे शाप देण्यास सक्षम आहेत ते पूजनीय गुरूच्या उपस्थितीत शक्तिहीन आहेत.आदरणीय गुरूंच्या हस्तक्षेपामुळे ते लवकरच नाश पावतील.

अशक्ता हि सुराद्याश्च, अशक्ता मुनयस्तथा I

गुरुशापेन ते शीघ्रं, क्षयं यान्ति न संशयः II

aśaktā hi surādyāśca, aśaktā munayastathā I

guruśāpena te śīghraṃ, kṣayaṃ yānti na saṃśayaḥ II

107. हे पार्वती! "गुरू" ही दोन अक्षरे तर मंत्रांचा राजा होत! सर्व महान धर्मग्रंथ, वेद आणि भव्य अध्यात्मिक उद्धरणात (संस्कृतमध्ये त्यांना महावाक्य म्हटले जाते) असे घोषित केले गेले आहे की, "गुरु" हा शब्दच एखाद्या व्यक्तीस आत्म-साक्षात्कार, मुक्ती किंवा मोक्ष मार्गाकडे घेऊन जातो.

मंत्रराजमिदं देवि, गुरुरित्यक्षर द्वयम् I

स्मृतिवेदार्ध वाक्येन, गुरुः साक्षात् परंपदम् II

maṃtrarājamidaṃ devi, gururityakṣara dvayam I

smṛtivedārdha vākyena, guruḥ sākṣāt paraṃpadam II

108. श्रुतिस्मृति न जाणणारे, वेदान्ताचा अभ्यास (प्राचीन काळापासून

मौखिक परंपरेने किंवा लिखित परंपरेने) न करणारे देखील केवळ गुरुसेवा करून 'संन्यासी' ह्या संज्ञेला प्राप्त होतात. इतरांना केवळ वेषधारी, नामधारीच समजले पाहिजे.

शृति स्मृतिअविज्ञाय, केवलं गुरुसेवकाः I

ते वै संन्यासिनः प्रोक्ता, इतरे वेषधारिणाः II

śṛti smṛtiavijñāya, kevalaṃ gurusevakāḥ I

te vai saṃnyāsinaḥ proktā, itare veṣadhāriṇāḥ II

109-110. आदरणीय गुरूंच्या कृपेने एखाद्या मनुष्याने "आत्म" किंवा स्वतःत निवास करणाऱ्या आत्म्यावर ध्यान केले पाहिजे. एखाद्याने हे जाणवले पाहिजे की आत्म (किंवा आत्मा तत्व) हे सार चिरंतन आहे, ते सर्वसमर्थ (किंवा ब्रम्ह) आहे आणि निर्गुण, निराभास आहे. सर्व ब्रह्म आहे (किंवा सर्वोच्च देवत्व).एका दिव्याने दुसरा दिवा लावला कि दैवीयता (प्रकाश) पसरते. मूळ दिवा आणि पुढच्या दिवा जो पहिल्यापासून प्रकाशित झाला आहे यांच्यात कोणताही फरक नाही. अशाच प्रकारे, दोन मनुष्यामध्यें भेद करू नये. हेच "गुरु-शिष्य" परंपरेचे सार आहे ज्याद्वारे व्यक्ती ज्ञानमार्गावर प्रवेश करतो.

नित्यं ब्रह्मनिराकारं निर्गुणं बोधयेत् परम् I

सर्वं ब्रह्म निराभासं दीपो दीपान्तरं यथा II

गुरोःकृपा प्रसादेन, आत्मारामं निरीक्षयेत् I

अनेन गुरुमार्गेण, स्वात्म ज्ञानं प्रवर्तते II

nityaṃ brahmanirākāraṃ nirguṇaṃ bodhayet param I

sarvaṃ brahma nirābhāsaṃ dīpo dīpāntaraṃ yathā II

guroḥkṛpā prasādena, ātmārāmaṃ nirīkṣayet I

anena gurumārgeṇa, svātma jñānaṃ pravartate II

111. ब्रह्मदेवापासून ते तृणवत जीवापर्यंत, स्थावर आणि जंगम, चराचररूप सर्वच गुरूचे स्वरुप आहे. म्हणून मी अशा पूजनीय गुरूला नमन करतो.

आब्रह्मस्तम्ब पर्यन्तं परमात्म स्वरूपकम् ।

स्थावरं जंगमं चैव, प्रणमामि जगन्मयम् ॥

ābrahmastamba paryantaṃ paramātma svarūpakam I

sthāvaraṃ jaṃgamaṃ caiva, praṇamāmi jaganmayam II

112. श्रीगुरुला मी नमस्कार करतो जो कि सदा सच्चिदानंदस्वरूप, भेदरहित, नित्य, पूर्ण (अविभाजित), निराकार, निर्गुण, स्वात्म्यामध्ये अवस्थित आहे. हे तेच रूप आहे ज्यामध्ये परिपूर्ण ज्ञान, परिपूर्ण अस्तित्व आणि परिपूर्ण आनंद या तीन गुणांचा समावेश आहे. ते निरपेक्ष सत्य देखील आहे, पूर्ण आहे (ज्याच्या स्वभावात कोणत्याही प्रकारच्या अपूर्णतेचा लवलेशही नाही).

वन्देऽहं सच्चिदानंदं, भेदातीतं सदा गुरुम् ।

नित्यं पूर्णं निराकारं, निर्गुणं स्वात्म संस्थितम् ॥

vande'haṃ saccidānaṃdaṃ, bhedātītaṃ sadā gurum I

nityaṃ pūrṇaṃ nirākāraṃ, nirguṇaṃ svātma saṃsthitam II

113. गुरूचे पूजनीय रूप हे नित्य आनंदकारक आहे. हे शुद्ध स्फटिकासमान निर्मल आहे,आणि प्रत्येकाच्या हृदयाकाशात मध्यभागी स्थित असलेले गुरूचे असे पूजनीय रूप ध्यान करण्यायोग्य आहे.

परात्परतरं ध्येयं, नित्यमानन्दकारकम् ।

हृदयाकाश मध्यस्थं, शुद्धस्फटिक सन्निभम् ॥

parātparataraṃ dhyeyaṃ, nityamānandakārakam I

hṛdayākāśa madhyasthaṃ, śuddhasphaṭika sannibham II

114. जसे दर्पणात (आरशात) शुद्ध स्फटिकाची निश्चल प्रतिमा दिसते. तद्वतच आत्मप्रकाशात चिदाकार आनंदरूप परावर्तित होते. (येथे, आत्म ची तुलना शांत पाण्याबरोबर केली आहे). याचा अर्थ असा आहे की शिष्याला स्वतःच्या अंतःकरणाने हे समजते की तो स्वतः च " देव" आहे, ज्याला तो सर्वकाळ शोधण्याचा प्रयत्न करतो. (याचा अर्थ असा होतो की, तो मीच हा " सोऽहं " भाव प्रकट होतो.)

स्फटिक प्रतिमारूपं, दृश्यते दर्पणे यथा ।

तदात्मनि चिदाकार मानंदं सोऽहामित्युत ॥

sphaṭika pratimārūpaṃ, dṛśyate darpaṇe yathā I

tadātmani cidākāra mānaṃdaṃ so'hāmityuta II

115. हे पार्वती! अंगठ्याएवढ्या चिन्मय आत्म्याचे ध्यान करता करता जो भाव स्फुरतो तो मी तुला सांगतो, त्याचे श्रवण कर. (विविध चक्र किंवा उर्जा केंद्रे मानव शरीरात मस्तिष्कमेरू प्रणाली सोबत स्थित आहेत संस्कृत ग्रंथात "आत्म" पंचम चक्रात म्हणजेच "अनाहत चक्र" येथे अंगठ्याएवढ्या ज्योत स्वरूपात स्थित असल्याचे वर्णन आहे.

अर्थातच ते अदृश्य स्वरुपात असले पाहिजे.)

अंगुष्ठमात्र पुरुषं ध्यायतश्चिन्मयं हृदि ।

तत्र स्फुरति भावोयः शृणुतं कथयाम्यहम् ॥

aṃguṣṭhamātra puruṣaṃ dhyāyataścinmayaṃ hṛdi I

tatra sphurati bhāvoyaḥ śṛṇutaṃ kathayāmyaham II

116. हे पार्वती! हे जाणून घ्या की पंचज्ञानेंद्रियांना अवगत न होणारे, जाणता न येणारे, नाम व रूप नसलेले, निशब्दपणाच ज्याचा भाव, मौन हेच ज्याचे स्वरूप तेच आत्म, ब्रह्मज्ञान किंवा ब्रह्मस्वरूप (सार्वभौम आत्मा किंवा सर्वशक्तिमान) होय.

अगोचरं तथाऽगम्यं, नामरूप विवर्जितम् ।

निः शब्दं तद्विजानीयात्, स्वभावं ब्रह्म पार्वती ॥

agocaraṃ tathā'gamyaṃ, nāmarūpa vivarjitam I

niḥ śabdaṃ tadvijānīyāt, svabhāvaṃ brahma pārvatī II

117. कापूर, फुले ह्यांच्या ठिकाणी स्वभावतःच सुगंध असतो. उष्णता किंवा शीतलता देखील नैसर्गिक असतात. तद्वत् निसर्गात ब्रह्म (सर्वशक्तिमान किंवा देवत्व) शाश्वत, चिरकाल होय.

यथागन्धः स्वभावेन, कर्पूर कुसुमादिषु ।

शीतोष्णादि स्वभावेन, तथाब्रह्मच शाश्वतम् ॥

yathāgandhaḥ svabhāvena, karpūra kusumādiṣu I

śītoṣṇādi svabhāvena, tathābrahmaca śāśvatam II

118. अळ्या स्वतःच आंतरिक (किंवा एखाद्या प्रकारे ध्यानपूर्वक) ध्यान केंद्रित करून मधमाशी म्हणून रूपांतरित होतात आणि प्रकट होतात. त्याचप्रमाणे सतत ब्रह्मस्वरूप पूजनीय गुरूचे ध्यान करून जीवात्मा (मानव म्हणून जन्मलेला) ब्रह्मरूप बनतो (याला आत्म-साक्षात्कार असे म्हणतात).

स्वयं तथा विधो भूत्वा, स्थातव्यं यत्र कुत्र चित् ।

कीटभ्रमरवत्तत्र, ध्यानं, भवति तादृशम् ॥

svayaṃ tathā vidho bhūtvā, sthātavyaṃ yatra kutra cit ।

kīṭabhramaravattatra, dhyānaṃ, bhavati tādṛśam ॥

119. अंतःकरणात गुरूचे असे ध्यान करता करता साधक ब्रह्ममय (किंवा देवत्व किंवा सर्वशक्तिमान) बनतो (तो ब्रह्मच पाहतो). तो उत्पत्तिच्या प्रभावापासून (भविष्यात “पिंडी” किंवा मानवी भ्रुणाच्या रूपातून), गतिवंत जीवन शक्तीच्या प्रभावापासून (“पद ” किंवा प्राणी रूपात गतिमान होऊन जन्मापासून) आणि रूप घेण्याच्या शक्तीच्या परिणामापासून ("रूप" किंवा मानवी रूप घेण्यापासून) मुक्त होतो. हे अगदी निःशंक आहे. (येथे प्रमुख शक्तीला तीन गुण दिलेले आहेत. एक ज्यामध्ये निर्माण करण्याची क्षमता आहे, दुसरे ज्यामध्ये हालचाल करण्याची क्षमता आहे आणि शेवटी एक म्हणजे ज्यामध्ये रूप घेण्याची क्षमता आहे. अशा प्रकारे, परिणामी मनुष्याची निर्मिती होते.)

गुरुध्यानं तथाकृत्वा, स्वयं ब्रह्ममयो भवेत् ।

पिण्डेपदे तथारूपे, मुक्तोऽसौ नात्रसंशयः ॥

gurudhyānaṃ tathākṛtvā, svayaṃ brahmamayo bhavet ।

piṇḍepade tathārūpe, muktto'sau nātrasaṃśayaḥ II

देवी पार्वती म्हणाली:

120. "हे महादेवा, पिंड म्हणजे काय, पद कशाला म्हणतात, रूप म्हणजे काय, रूपातीत होणे म्हणजे काय हे सारे मला सविस्तर सांगा."

पिण्डं किं तु महादेव, पदं किं समुदाहृतम् ।

रूपातीतं च रूपं किं, एतदाख्याहि शंकर ॥

piṇḍaṃ kiṃ tu mahādeva, padaṃ kiṃ samudāhṛtam I

rūpātītaṃ ca rūpaṃ kiṃ, etadākhyāhi śaṃkara II

श्रीमहादेव म्हणाले:

121. “पिंड” म्हणजे कुंडलिनी शक्ती किंवा स्वतःच्या आत (मानवी गर्भाच्या रूपात) उत्क्रांतीची सुप्त शक्ती, “पद” म्हणजे श्वास किंवा जीवन शक्ती हालचालीच्या स्वरूपात प्रकट होते,रूप म्हणजे “बिंदू” (सर्व रूपांचे सूक्ष्म कारण. प्राचीन संस्कृत शास्त्रानुसार विश्वाची रचना “नाद ”आणि“ बिंदू” किंवा अनुक्रमे गती व गोलाकार आकाराच्या बिंदूमधून झाली आहे) अशी शक्ती आहे जी जीवास भौतिक रूप प्रदान करते.आणि ज्याचे कोणतेही रूप किंवा गुणधर्म नाहीत (येथे तो ब्रम्ह किंवा सर्वशक्तिमान किंवा देवत्व आहे) त्यास "रूपातीत" म्हणून संबोधले जाते.

पिण्डं कुंडलिनी शक्तिः पदं हंस मुदाहृतम् ।

रूपं बिंदुरिति ज्ञेयं, रूपातीतं निरंजनम् ll

piṇḍaṃ kuṃḍalinī śaktiḥ padaṃ haṃsa mudāhṛtam l

rūpaṃ biṃduriti jñeyaṃ, rūpātītaṃ niraṃjanam ll

122. ज्याने "पिंड" (रचनात्मक बल)", "पद" (हालचालीच्या स्वरूपातील जीवनशक्ती) आणि "रूप" (स्वरुप धारण करणारी शक्ती) या तीन शक्तींच्या प्रभावापासून मुक्ती मिळवली आहे तोच (जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून) मुक्त होय किंवा त्यास आत्म साक्षात्कार होतो किंवा मोक्ष प्राप्त करतो ह्यात संशय नाही.

पिण्डे मुक्ता पदेमुक्ता, रूपेमुक्ता वरानने l

रूपातीत तु ये मुक्तास्ते मुक्ता नात्र संशयः ll

piṇḍe muktā pademuktā, rūpemuktā varānane l

rūpātīta tu ye muktāste muktā nātra saṃśayaḥ ll

123. व्यक्तीने स्वतः सर्वमय (म्हणजे सर्वव्यापी ब्रह्म किंवा देवत्वात मिसळले पाहिजे) बनले पाहिजे आणि सर्वोच्च तत्व किंवा परात्माचे सार जाणले पाहिजे. त्या परम तत्त्वापलिकडे दुसरे काही नाही. गुरुत्वाशिवाय इतर अस्तित्वाला आधार नाही.

स्वयं सर्वमयो भूत्वा, परं तत्त्वं विलोकयेत् l

परात्पर तरं नान्यत् , सर्वमेतन्निरालयम् ll

svayaṃ sarvamayo bhūtvā, paraṃ tattvaṃ vilokayet l

parātpara taraṃ nānyat , sarvametannirālayam ll

124. पूजनीय गुरूच्या कृपेने, साधकास सर्वोच्च सत्य (गुरु तत्व) कळल्यानंतर, त्याने सर्व आसक्ती व वासनांचा त्याग करावा आणि एकांत अनुभवावा.

तस्यावलोकनं प्राप्य, सर्व संग विवर्जितम् l

एकाकी निःस्पृह् शान्तस्तिष्ठासेत् तत्प्रसादतः ll

tasyāvalokanaṃ prāpya, sarva saṃga vivarjitam l

ekākī niḥspṛha śāntastiṣṭhāset tatprasādataḥ ll

125. स्वत: च्या “कर्मानुसार” (भूतकाळातील क्रियांमुळे संचित कर्म किंवा धार्मिक योगयतेनुसार) काही लाभ होवो न होवो, थोडे मिळो वा पुष्कळ प्राप्त होवो, स्थितप्रज्ञ निरिच्छपणे ते भोगावे, उत्कंठा दाखवू नये. त्याचे चित्त नेहमीच संतुष्ट किंवा समाधानी असले पाहिजे.

लब्धं वाऽधन लब्धं वा, स्वल्पं वा बहुळं तधा l

निष्कामेनैव भोक्तव्यं, सदा सन्तुष्ट चेतसा ll

labdhaṃ vā'dhana labdhaṃ vā, svalpaṃ vā bahuḻaṃ tadhā l

niṣkāmenaiva bhoktavyaṃ, sadā santuṣṭa cetasā ll

126. बुद्धिमान लोक असे म्हणतात कि इच्छारहित संतुष्ट चित्त म्हणजेच सर्वज्ञपद.परिणामी ती विशिष्ट व्यक्ती (येथे याचा अर्थ वैयक्तिक आत्मा आहे) देहधारी असूनही सर्वमय होतो. म्हणूनच तो सदा शांत, सदा आनंदात मग्न असतो.

सर्वज्ञ पदमित्याहु, र्देही सर्वमयो बुधाः I

सदानंदः सदाशान्तो, रमते यत्र कुत्र चित् II

sarvajña padamityāhu, rdehī sarvamayo budhāḥ I

sadānaṃdaḥ sadāśānto, ramate yatra kutra cit II

127. हे देवी, मी तुझ्यापुढे मुक्त पुरूषाची लक्षणे सांगितली. मुक्त पुरुष जेथे राहातो ते स्थान पवित्र आणि पुण्यशाली असते.

यत्रैव तिष्ठते सोऽपि स देशः पुण्यभाजनम् I

मुक्तस्य लक्षणं देवि, तवाग्रे कधितं मया II

yatraiva tiṣṭhate so'pi sa deśaḥ puṇyabhājanam I

muktasya lakṣaṇaṃ devi, tavāgre kadhitaṃ mayā II

128. हे देवी! “पूज्य गुरूची उपासना” करण्याच्या मार्गाने एखादी व्यक्ती कशी मोक्ष (आत्म-प्राप्ति किंवा मुक्ती) प्राप्त करते हे मी तुम्हाला स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे, पूजनीय गुरूची उपासना करण्यामागील ध्येय मी तुम्हाला समजावून सांगितले आहे.

उपदेशस्तथा देवि, गुरुमार्गेण मुक्तिदः I

गुरुभक्ति स्तथा ध्यानं, सकलं तव कीर्तितम् II

upadeśastathā devi, gurumārgeṇa muktidaḥ I

gurubhakti stathā dhyānaṃ, sakalaṃ tava kīrtitam II

129. हे महाबुद्धिशालिनी (हे देवी!), मी आता तुम्हाला समजावून देतो की वर नमूद केलेल्या योगाभ्यास करून सामान्य जगाला काय फायदा होईल. या पद्धती देखील भौतिक स्वरूपात आहेत असे समजणे चुकीचे आहे (हे सत्य आहे कि साधकांना काही भौतिकवादी फायदे देखील झाले आहेत. परंतु ते केवळ अतिरिक्त फायदे आहेत आणि म्हणूनच चुकीच्या निष्कर्षावर येऊ नये). वरील सर्व नमूद केलेल्या किंवा स्पष्ट केलेल्या पद्धती खरोखरच दैवी आहेत.

अनेन यद् भवेत्कार्यं, तद्वदामि महामते ।

लोकोपकारकं देवि, लौकिकं तु न भावयेत् ॥

anena yad bhavetkāryaṃ, tadvadāmi mahāmate I

lokopakārakaṃ devi, laukikaṃ tu na bhāvayet II

130. ज्ञानहीन लोक (स्वतःतल्या दिव्य स्वरूपाबद्दल अनभिज्ञ) आपल्या कर्माप्रमाणे (भूतकाळातील, वर्तमान आणि भविष्यातील कृतीतून) प्राप्त झालेल्या संसारसमुद्रात पडतात. ज्ञानी लोक देखील काही कर्म (कृती) करतात पण ते अशा मानसिक अवस्थेने करतात जे कोणत्याही उत्कटतेने किंवा आसक्तीने मुक्त असतात. म्हणूनच, अशी कर्मे त्यांना बांधत नाहीत किंवा अशा कृतींमुळे कोणत्याही गोष्टी किंवा कोणाशीही बांधले जात नाहीत. (याचा अर्थ असा आहे की त्या क्रियांचा कोणताही परिणाम होणार नाही किंवा असे सर्व कर्म निष्कर्म बनते).

लौकिकात्कर्मणो यान्ति, ज्ञान हीना भवार्णवम् ।

ज्ञानी तु भावयेत्सर्वं, कर्म निष्कर्म यत्कृतम् ॥

laukikātkarmaṇo yānti, jñāna hīnā bhavārṇavam I

jñānī tu bhāvayetsarvaṃ, karma niṣkarma yatkṛtam II

131. जो कोणी श्रीगुरुगीता भक्तिभावपूर्वक पठण करतो, श्रवण करतो अथवा अगदी त्याची एक प्रत बनवितो आणि इतरांना देवत्वाची भक्ती करण्याच्या दृष्टिकोनातून भेट म्हणून देतो, तो सर्व सांसारिक समस्यांपासून मुक्त होतो.

इदंतु भक्ति भावेन, पठते शृणुते यदि ।

लिखित्वा तत्प्रदातव्यं, दानं दक्षिणया सह ॥

idaṃtu bhakti bhāvena, paṭhate śṛṇute yadi I

likhitvā tatpradātavyaṃ, dānaṃ dakṣiṇayā saha II

132. हे देवी, श्रीगुरुगीतारूपी शुद्धतत्त्व मी तुला सांगितले. भवव्याधिनाश करण्यासाठी सदा श्रीगुरुगीता स्वतः जपावी, म्हणावी.

गुरुगीतात्मकं देवि, शुद्धतत्त्वं मयोदितम् ।

भवव्याधि विनाशार्थं, स्वयमेव जपेस्सदा ॥

gurugītātmakaṃ devi, śuddhatattvaṃ mayoditam I

bhavavyādhi vināśārthaṃ, svayameva japessadā II

133. गुरुगीतेचे एक एक अक्षर परम मंत्र आहे. दुसरे अनेक मंत्र ह्याच्या सोळाव्या भागाचीही बरोबरी करू शकणार नाहीत.

गुरुगीताक्षरैकं तु, मंत्रराजमिमं जपेत् ।

अन्येच, विविधा मंत्राः कलां नार्हन्ति षोडशीम् ॥

gurugītākṣaraikaṃ tu, maṃtrarājamimaṃ japet I

anyeca, vividhā maṃtrāḥ kalāṃ nārhanti ṣoḍaśīm II

134. श्रीगुरुगीता पठण केल्याने विशेष धार्मिक योग्यता प्राप्ति होते. सर्व पापनाश होतो आणि सर्व प्रकारचे दु: ख,दारिद्र्य किंवा त्रास नष्ट होतात.

अनन्त फलमाप्नोति, गुरुगीता जपेन तु ।

सर्वपाप प्रशमनं, सर्वदारिद्र्य नाशनम् ।।

ananta phalamāpnoti, gurugītā japena tu I

sarvapāpa praśamanaṃ, sarvadāridrya nāśanam II

135-136. श्रीगुरुगीतेचे सामर्थ्यच असे की श्रीगुरुगीता काळाच्या व मृत्युच्या भयापासून भयप्राप्ती करून देते. सर्व संकटांचा नाश करते. यक्ष, राक्षस, भूत, चोर, व्याघ्रादिपासूनचे भय हरण करते. श्रीगुरुगीताजपाने सर्व प्रकारच्या महाव्याधी दूर होतात. सिद्धिदायिनी विभूतीची प्राप्ती होते.सर्व ऎश्वर्यरूपी सिद्धी प्राप्त होतात. तसेच, संमोहन, वशीकरण विद्याही प्राप्त होतात.

कालमृत्युभयहरं, सर्वसंकट नाशनम् ।

यक्षराक्षस भूतानां, चोरव्याघ्र भयापहम् ।।

महाव्याधिहरं सर्वं, विभूति सिद्धिदं भवेत् ।

अथवा मोहनं वश्यं, स्वयमेव जपेत्सदा ।।

kālamṛtyubhayaharaṃ, sarvasaṃkaṭa nāśanam I

yakṣarākṣasa bhūtānāṃ, coravyāghra bhayāpaham II

mahāvyādhiharaṃ sarvaṃ, vibhūti siddhidaṃ bhavet I

athavā mohanaṃ vaśyaṃ, svayameva japetsadā II

137-139. हे देवी, संस्कृतमध्ये "आसन" (मुद्रा नव्हे) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या ध्यानस्थानावर बसून जेव्हा गुरु गीतेच्या पुनरावृत्तीमुळे उद्भवलेल्या वेगवेगळ्या फायद्यांविषयी मी आता स्पष्टपणे सांगेन. वस्त्रासनावर बसून श्रीगुरुगीतेचा जप केल्यास दारिद्र्य प्राप्त होते. दगडावर बसून जप केल्यास रोगाचा उद्भव होतो. जमिनीवर बसून श्रीगुरुगीतेचा जप केल्यास दुःख प्राप्त होते आणि लाकडावर बसून जप केल्यास जप निष्फळ होतो (त्याचा काही परिणाम होत नाही). काळ्या हरणाच्या कातड्यावर बसून जप केल्यास ज्ञानाची प्राप्ती होते. वाघाच्या कातड्यावर बसून जप केल्यास मोक्षप्राप्ती आणि लक्ष्मीकृपा होते, कुशआसन वापरल्यास ज्ञानसिद्धि आणि कांबळ्यावर (लोकर) सर्व सिद्धी (अलौकिक शक्ती) प्राप्त होतात.

वस्त्रासने च दारिद्र्य, पाषाणेरोग संभवः ।

मेदिन्यां दुःखमाप्नोति, काष्टे भवति निष्फलम् ॥

कृष्णाजिने ज्ञानसिद्धि, र्मोक्ष श्री र्व्याघ्रचर्मणि ।

कुशासने ज्ञानसिद्धिः सर्वसिद्धिस्तु कम्बले ॥

कुशैर्वा दुर्वया देवि, आसने शुभ्र कम्बले ।

उपविश्य ततो देवि, जपेदेकाग्रमानसः ॥

vastrāsane ca dāridrya, pāṣāṇeroga saṃbhavaḥ I

medinyāṃ duḥkhamāpnoti, kāṣṭe bhavati niṣphalam II

kṛṣṇājine jñānasiddhi, rmokṣa śrī rvyāghracarmaṇi I

kuśāsane jñānasiddhiḥ sarvasiddhistu kambale II

kuśairvā durvayā devi, āsane śubhra kambale I

upaviśya tato devi, japedekāgramānasaḥ II

140. प्रिय! (देवी ही भगवान शिवची पत्नी आहे) गुरु गीता पठण करतांना मनःशांतीसाठी शुभ्र आसन वापरले पाहिजे. दुसऱ्याचे मन वश किंवा आकर्षित करण्यासाठी लाल रंगाचे आसन साहाय्यकारक ठरते. द्वेषबुद्धी अथवा अपकारबुद्धी लोप पावण्यासाठी काळ्या रंगाचे आसन उपयोगी पडते. धनप्राप्तीची आशा, इच्छा बाळगून असणाऱ्याने पिवळ्या रंगाचे आसन वापरावे.

ध्येयं शुक्लंच शान्त्यर्धं, वश्ये रक्तासनं प्रिये ।

अभिचारे कृष्णवर्णं, पीतवर्णनं धनागमे ॥

dhyeyaṃ śuklaṃca śāntyardhaṃ, vaśye raktāsanaṃ priyeI

abhicāre kṛṣṇavarṇaṃ, pītavarṇanaṃ dhanāgame II

141. ज्याला मनःशांती हवी त्या साधकाने उत्तरेला तोंड करून बसावे. वशीकरणासाठी पूर्वेला तोंड करून बसावे. जारणमारण विद्येसाठी, शत्रूच्या पारिपत्यासाठी, वैरभाव नाशासाठी दक्षिणेस तोंड करून बसावे. धनप्राप्तीची इच्छा असल्यास पश्चिम दिशेला तोंड करून बसावे.

उत्तरे शान्ति कामस्तु, वश्ये पूर्व मुखोजपेत् ।

दक्षिण मारणं प्रोक्तं, पश्चिमे च धनागमः ॥

uttare śānti kāmastu, vaśye pūrva mukhojapet I

dakṣiṇa māraṇaṃ proktaṃ, paścime ca dhanāgamaḥ II

142. हा श्रीगुरुगीतापाठ सर्व प्राण्यांना मोहून टाकणारा, सर्व बंधनातून मुक्त करणारा, देवराजाची प्रीती संपादन करून देणारा आणि सर्व लोकांना (तसेच परलोक) वश करून घेणारा होय.

मोहनं सर्वभूतानां, बन्ध मोक्षकरं भवेत् I

देवराज प्रियकरं, सर्वलोक वशं भवेत् II

mohanaṃ sarvabhūtānāṃ, bandha mokṣakaraṃ bhavet I

devarāja priyakaraṃ, sarvaloka vaśaṃ bhavet II

143. कोणासही संमोहित किंवा स्तंभित करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणारे, गुणवर्धक (मानसिक भावनांशी संबंधित), दुष्कर्मनाशक, सुकर्मफलदायी असे हे श्रीगुरुगीतापठण होय.

सर्वेषा स्तम्भन करं, गुणानां च विवर्धनम् I

दुष्कर्म नाशनं चैव, सुकर्म सिद्धिदं भवेत् II

sarveṣā stambhana karaṃ, guṇānāṃ ca vivardhanam I

duṣkarma nāśanaṃ caiva, sukarma siddhidaṃ bhavet II

144. श्रीगुरुगीता जपणाऱ्याचे दैनंदिन जीवनातील सर्व कठीण, गुंतागुंतीचे आणि अपूर्ण कार्य पूर्ण होते. नवग्रहांची पीडा दूर होते व त्याच्या भयापासून मुक्ती मिळते, वाईट स्वप्नांचा नाश होतो. चांगली

स्वप्ने सत्य, खरी ठरतात. आणि परिणाम द्रुतगतीने लाभतात.

असिद्धं साधयेत् कार्यं, नवग्रह भयापहम् ।

दुः स्वप्न नाशनं चैव, सुस्वप्न फलदायकम् ॥

asiddhaṃ sādhayet kāryaṃ, navagraha bhayāpaham I

duḥ svapna nāśanaṃ caiva, susvapna phaladāyakam II

145. श्रीगुरुगीतापठणाने सदैव सर्व तऱ्हेची शांती मिळते, वंध्येला पुत्रप्राप्ती होते. वैधव्याची कुऱ्हाड कोसळत नाही. नेहमी सौभाग्याचीच वृद्धी होते.

सर्वशान्तिकरं नित्यं तथावंध्या सुपुत्रदम् ।

अवैधव्यकरं स्त्रीणां, सदा सौभाग्यदायकं ॥

sarvaśāntikaraṃ nityaṃ tathāvaṃdhyā suputradam I

avaidhavyakaraṃ strīṇāṃ, sadā saubhāgyadāyakaṃ II

146. श्रीगुरुगीता जपल्याने आयुष्य दीर्घायुष्य होते, आरोग्य लाभते.पुत्रपौत्रवृद्धि होते. विधवा स्त्री जर निष्काम भावाने श्रीगुरुगीता जपेल तर तिला मुक्ती मिळेल.

आयुरारोग्य मैश्वर्यं, पुत्र पौत्र प्रवर्थनम् ।

अकामतः स्त्री विधवा, जपान्मोक्ष मवाप्नुयात् ॥

āyurārogya maiśvaryaṃ, putra pautra pravarthanam I

akāmataḥ strī vidhavā, japānmokṣa mavāpnuyāt II

147. विधवेने जर विरक्ती किंवा निष्काम भक्तीने श्रीगुरुगीता जपल्यास दुसऱ्या जन्मी सौभाग्यप्राप्ति होईल.तिच्या आयुष्यातले सर्व दुःख, भय, विघ्न नष्ट होतील. तसेच शापांचाही (सर्व दुष्ट व्यवधान) नाश होईल.

अवैधव्यं सकामा तु, लभते चान्य जन्मनि I

सर्व दुःख भयं विघ्नं, नाशयेच्छाप हारकम् II

avaidhavyaṃ sakāmā tu, labhate cānya janmani I

sarva duḥkha bhayaṃ vighnaṃ, nāśayecchāpa hārakam II

148. श्रीगुरुगीता जपल्याने सर्व बाधांची शांती होते. धार्मिकता (नैतिकता), धन संचय, सर्व इच्छापूर्ती, आणि मुक्ती किंवा मोक्षप्राप्ती असे चारही हेतू साध्य होतात. जो जे वांच्छिल ते लाभते.

सर्वबाधा प्रशमनं, धर्मार्धकाममोक्षदम् I

यं यं चिंतयते कामं, तं तं प्राप्नोति निश्चितम् II

sarvabādhā praśamanaṃ, dharmārdhakāmamokṣadam I

yaṃ yaṃ ciṃtayate kāmaṃ, taṃ taṃ prāpnoti niścitam II

149. सकाम भक्ती करणाऱ्यांची श्रीगुरुगीता सर्व इच्छापूर्ती करणारी कामधेनु होय. कल्पना (कामना) करणाऱ्यांसाठी संकल्प (कामना) तडीस नेणारा कल्पवृक्ष म्हणजे श्रीगुरुगीता होय. मन व बुद्धीप्रमाणे चित्ताचेही सुखसमाधान, शांती श्रीगुरुगीतापठणाने होते म्हणून श्रीगुरुगीता चिंतामणी पण होय. श्रीगुरुगीता सर्वांचेच मंगल करते. अमंगलाला शुद्ध

करून त्याचे कल्याण साधते.

कामितस्य कामधेनुः, कल्पना कल्पपादपः ।

चिंतामणि श्चिंतितस्य, सर्वमंगळ कारकम् ॥

kāmitasya kāmadhenuḥ, kalpanā kalpapādapaḥ I

ciṃtāmaṇi ściṃtitasya, sarvamaṃgaḻa kārakam II

150. हे देवी, शक्तीचे उपासक, सूर्योपासक, गणपति, भगवान विष्णु (विश्वाचा कर्ता), भगवान शिव (विश्वाचा संहारक) आदि सर्व भिन्न भिन्न देवदेवतांचे उपासक असतील तरी त्यांनाही श्रीगुरुगीता सिद्धिप्रद होते; ह्यात मुळीच संशय नाही.

जपेच्छाक्तश्च सौरश्च, गाणापत्यश्च वैष्णवः ।

शैवश्च सिद्धिदं देवि, सत्यं सत्यं न संशयः ॥

japecchāktaśca sauraśca, gāṇāpatyaśca vaiṣṇavaḥ I

śaivaśca siddhidaṃ devi, satyaṃ satyaṃ na saṃśayaḥ II

151. मोक्षप्राप्तीचे ध्येय ठेवणाऱ्या मुमुक्षूने श्रीगुरुगीता नित्य जपली तर त्याला मुक्ती नक्की लाभेल. त्याचबरोबर केवळ भोगप्राप्तीचीच इच्छा धरून श्रीगुरुगीता वाचणाऱ्यालाही सर्व इंद्रियभोगसुख लाभेल.

मोक्षहेतुर्जपेनित्यं मोक्षश्रियमप्नुयात् ।

भोगकामो जपेद्योवै तस्यकाम फलप्रदम् ॥

mokṣaheturjapenityaṃ mokṣaśriyamapnuyāt I

bhogakāmo japedyovai tasyakāma phalapradam II

152-154. हे सुमुखी, आता कामना धरून कोठे जप करावा, त्या स्थानाचे वर्णन करतो. समुद्रकिनारी किंवा नदीकाठी, शिवालयात वा विष्णूच्या मंदिरात, देवीच्या देवळात (शक्तीपीठ) किंवा कोणत्याही देवालयात हि सर्वच स्थाने शुभ आहेत. शुभ अशा वडाच्या किंवा आवळीच्या झाडाखाली, मठात, तुळशीवृंदावनाजवळ तसेच पवित्र निर्मळ स्थळी ह्या श्रीगुरुगीताजपाचे नित्य अनुष्ठान शांत मनाने, वैराग्याने करावे.

अथकाम्य जपे स्थानं, कथयामि वरानने ।

सागरेवा सरित्तीरेऽधवा हरि हरालये ॥

शक्ति देवालये गोष्ठे, सर्व देवालये शुभे ।

वटे च धात्रि मूले वा, मठेवृंदावने तथा ॥

पवित्रे निर्मले स्थाने, नित्यानुष्ठान तोऽपिवा ।

निर्वेदनेन मौनेन, जपमेतं समाचरेत् ॥

athakāmya jape sthānaṃ, kathayāmi varānane I

sāgarevā sarittīre'dhavā hari harālaye II

śakti devālaye goṣṭhe, sarva devālaye śubhe I

vaṭe ca dhātri mūle vā, maṭhevṛṃdāvane tathā II

pavitre nirmale sthāne, nityānuṣṭhāna to'pivā I

nirvedanena maunena, japametaṃ samācaret II

155. स्मशानभूमीत वटवृक्षाखाली, आम्रवृक्षाच्या सान्निध्यात किंवा

धोत्र्याच्या मुळाशी बसून श्रीगुरुगीता जपल्यास द्रुत परिणाम मिळतात.

स्मशाने भयभूमौतु, वटमूलान्तिके तथा ।

सिद्ध्यन्ति धौत्तरेमूले, चूतवृक्षस्य सन्निधौ ॥

smaśāne bhayabhūmautu, vaṭamūlāntike tathā I

siddhyanti dhauttaremūle, cūtavṛkṣasya sannidhau II

156. एखाद्या मतिमंद (लौकिक दृष्ट्या मूर्ख) व्यक्तीस पूजनीय गुरूने शिष्य म्हणून स्वीकारले असेल आणि त्याने योगासने जरी (संस्कृतमध्ये साधन) केले तर त्याला सर्व यश मिळेल. त्याउलट, पूजनीय गुरूंकडून दीक्षा प्राप्त न झालेल्या अगदी सुसंस्कृत व्यक्तीने (संस्कृतमधील पंडित) केलेल्या पवित्र / धार्मिक कृत्ये, योगासने, धार्मिक विधी, कठोर तपस्या / आव्हानात्मक योग पद्धती इत्यादी फलदायी ठरणार नाहीत. याचा अर्थ असा की पूज्य गुरूशिवाय कोणालाही काहीही साध्य होणार नाही मग ती व्यक्ती मूर्ख असो वा सुशिक्षित!

गुरुपुत्रो वरं मूर्खस्तस्य सिध्यन्ति नान्यथा ।

शुभकर्माणि सर्वाणि दीक्षाव्रत तपांसि च ॥

guruputro varaṃ mūrkhastasya sidhyanti nānyathā I

śubhakarmāṇi sarvāṇi dīkṣāvrata tapāṃsi ca II

157. गुरुतत्त्वज्ञानी श्रीगुरुगीतारूपी जलात सदैव स्नान करावे (याचा अर्थ असा आहे की या ग्रंथाचा नियमितपणे अभ्यास करणे आवश्यक आहे).संसारमलनाशार्थ (विषयभोगाच्या आसक्तीचे संचय रोखण्यासाठी), भवबन्धमुक्त (जन्म मृत्यूच्या पाषातून सुटका) होण्यासाठी गुरु गीतेचा नियमित अभ्यास करणे आवश्यक आहे.

संसार मल नाशार्धं, भवपाश निवृत्तये ।

गुरुगीताम्भसि स्नानं, तत्त्वज्ञः कुरुते सदा ॥

saṃsāra mala nāśārdhaṃ, bhavapāśa nivṛttaye I

gurugītāmbhasi snānaṃ, tattvajñaḥ kurute sadā II

158. जो सद् ब्रह्म जाणतो तोच साक्षात गुरू होय. गुरू ज्या ठिकाणी निवास करतो ती सर्व स्थाने पवित्र होत ह्यात संशय नाही.

स एवच गुरुः साक्षात्, सदा सद् ब्रह्मवित्तमः ।

तस्य स्थानानि सर्वाणि, पवित्राणि न संशयः ॥

sa evaca guruḥ sākṣāt, sadā sad brahmavittamaḥ I

tasya sthānāni sarvāṇi, pavitrāṇi na saṃśayaḥ II

159. सर्वशुद्ध व पवित्र असा गुरू सहजरीत्या जेथे वास्तव्य करतो त्या क्षेत्री, त्या पिठात सर्व देवतांचा समुदाय निवास करतो.

सर्वशुद्धः पवित्रोऽसौ स्वभावा द्यत्र तिष्ठतिः ।

तत्र देवगणाः सर्वे क्षेत्रे पीठे वसन्तिहि ॥

sarvaśuddhaḥ pavitro'sau svabhāvā dyatra tiṣṭhatiḥ I

tatra devagaṇāḥ sarve kṣetre pīṭhe vasantihi II

160-161. ज्ञानी गुरुभक्त आसनावर ध्यान मुद्रामध्ये बसलेले असो, शयन स्थितीत असो, चालत असो की उभा असो, बोलत असो,

घोड्यावर वा हत्तीवर स्वार (स्वार होऊन किंवा प्रवास करताना) होऊन असो, गाढ झोपेत (विचलित किंवा गाफील) असो वा जागृतीत असो;नेहमीच गुरु गीतेचे पठण करतात. जो श्रीगुरुगीताजपाने पवित्र बनून गेलेला आहे, त्याच्या केवळ दर्शनानेही पुनर्जन्म प्राप्त होत नाही. (याचा अर्थ असा आहे की या ग्रंथाच्या किंवा गुरू गीतेच्या अभ्यासामुळे प्राप्त झालेला परिणाम अमर्याद आहे).

आसनस्थः शयना वा गच्छँस्तिष्ठन्वदन्नपि I

अश्वारूढो गजारूढः सुप्तो वा जागृतोऽपि वा II

शुचिषांश्च सदाज्ञानी, गुरुगीता जपेन तु I

तस्यदर्शन मात्रेण, पुनर्जन्म न विद्यते II

āsanasthaḥ śayanā vā gacchaṁstiṣṭhanvadannapi I

aśvārūḍho gajārūḍhaḥ supto vā jāgṛto'pi vā II

śuciṣāṃśca sadājñānī, gurugītā japena tu I

tasyadarśana mātreṇa, punarjanma na vidyate II

162-163. जसे समुद्रात दुसरे पाणी, दुधात दूध, तूपात तूप आणि आकाशात घटाकाश मिळून जाते, तसाच आत्मा परमात्म्यात किंवा सर्वशक्तिमान किंवा ईश्वरात मिळून जातो. ह्या प्रकारे ज्ञानी जीवात्मा रात्र असो की दिवस असो नेहमीच परमात्म्यात लीन असतो. याचा अर्थ असा की ज्ञानी लोक देहरुपात जिवंत असूनही ते ऐहिक जीवनापासून अलिप्त असतात.

समुद्रे च यथा तोयं, क्षीरे क्षीरं – घृते घृतम् I

भिन्ने कुम्भे यथाकाशः, स्तथात्म परमात्मनि II

तथैव ज्ञानी जीवात्मा, परमात्मनि लीयते ।

ऐक्येन रमते ज्ञानी, यत्र तत्र दिवानिशम् ॥

samudre ca yathā toyaṃ, kṣīre kṣīraṃ – ghṛte ghṛtam I

bhinne kumbhe yathākāśaḥ, stathātma paramātmani II

tathaiva jñānī jīvātmā, paramātmani līyate I

aikyena ramate jñānī, yatra tatra divāniśam II

164-166. हे पार्वती! अशा प्रकारे, ज्ञानी लोक सदाच मुक्त असतात.सर्वप्रयत्नपूर्वक भावपूर्ण होऊन ते (ज्ञानी / योग अभ्यासक) सर्व प्रकारच्या शंकांपासून मुक्त होतात. गुरुभक्ताला भुक्ति व मुक्ती दोन्ही प्राप्त होतात. गुरुभक्ताच्या जिभेच्या टोकावर प्रत्यक्ष सरस्वती वास करते. या ग्रंथाच्या अभ्यासामुळे किंवा पठनाने सर्व प्रकारच्या अलौकिक शक्ती प्राप्त झाल्यावर शेवटी व्यक्तीला मोक्ष किंवा आत्मज्ञान प्राप्त होते. यात काही शंका नाही.

एवं विधो महामुक्तः सर्वदा वर्तते बुधः ।

तस्य सर्वप्रयत्नेन, भावभक्तिं करोति यः ॥

सर्व सन्देह रहितो, मुक्तो भवति पार्वति ।

भुक्ति मुक्ति द्वयं तस्य, जिह्वाग्रे च सरस्वती ॥

अनेन प्राणिनः सर्वे, गुरुगीता जपेन तु ।

सर्वसिद्धिं प्राप्नुवन्ति, भुक्तिं मुक्तिं न संशयः ॥

evaṃ vidho mahāmuktaḥ sarvadā vartate budhaḥ I

tasya sarvaprayatnena, bhāvabhaktiṃ karoti yaḥ II

sarva sandeha rahito, mukto bhavati pārvati I

bhukti mukti dvayaṃ tasya, jihvāgre ca sarasvatī II

anena prāṇinaḥ sarve, gurugītā japena tu I

sarvasiddhiṃ prāpnuvanti, bhuktiṃ muktiṃ na saṃśayaḥ II

167. हे सुमुखी (येथे भगवान शिव आपल्या पत्नीस शक्ती संबोधित करीत आहेत) धर्म (दैंनदिन मानवी जीवनात आचरणचा योग्य मार्ग) आणि सांख्य (भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा प्रणालींपैकी एक ज्यानुसार 36 गुणांनी या विश्वाची सूक्ष्म आणि स्थूल स्तरावर रचना झाली आहे) आणि माझ्याद्वारे विकसीत इतर महान शिक्षा देखील श्रीगुरुगीते समान नाहीत. हे सत्य आहे, पूर्ण सत्य आहे.

सत्यं सत्यं पुनः सत्यं, धर्मं सांख्यं मयोदितम् I

गुरुगीता समं नास्ति, सत्यं सत्यं वरानने II

satyaṃ satyaṃ punaḥ satyaṃ, dharmaṃ sāṃkhyaṃ mayoditam I

gurugītā samaṃ nāsti, satyaṃ satyaṃ varānane II

168. गुरुच एक देव होय. गुरुच एक धर्म होय. गुरुच एक निष्ठा, एकच श्रेष्ठ तपही होय. गुरुहून श्रेष्ठ काही नाही. गुरुपुढे महान कोठलेही तत्त्व नाही.

एकोदेव एक धर्म एक निष्टा परंतपः I

गुरोः परतरं नान्यत्, नास्ति तत्त्वं गुरोः परम् II

ekodeva eka dharma eka niṣṭā paraṃtapaḥ I

guroḥ parataraṃ nānyat, nāsti tattvaṃ guroḥ param II

169. हे देवी, गुरुभक्ताचे माता-पिता, कुळ, वंश धन्य होय. तसेच ज्या ठिकाणी गुरुभक्त निवास करतो अशी जमीन देखील गुरुभक्तांमुळे धन्यता पावते.

माता धन्या पिताधन्यो, धन्योवंशः कुलंतथा ।

धन्याच वसुधादेवि, गुरुभक्तिः सुदुर्लभा ॥

mātā dhanyā pitādhanyo, dhanyovaṃśaḥ kulaṃtathā I

dhanyāca vasudhādevi, gurubhaktiḥ sudurlabhā II

170. हे देवी, शरीर, इंद्रिये, प्राण, स्वजनबांधव, माता, पिता, कूळ इ. सर्व देखील पूजनीय गुरु समान नाहीत, ह्यात संशय नाही.

शरीरमिन्द्रिय प्राणश्चार्थः स्वजन बांधवाः ।

मातापिताकुलंदेवि, गुरुरेव न संशयः ॥

śarīramindriya prāṇaścārthaḥ svajana bāṃdhavāḥ I

mātāpitākulaṃdevi, gurureva na saṃśayaḥ II

171. हे देवी, कल्पांतापर्यंत म्हणजे कोटी कोटी जन्मांचे किंवा सृष्टीच्या निर्मितीपासून केलेले जप, व्रत, तप इ. सर्व क्रिया एक मात्र गुरूला संतोषित, प्रसन्न केल्यानेच सफल होऊ शकतात.

आ कल्पं जन्मनाकोट्य, जपव्रत तपः क्रियाः ।

तत्सरं सफलंदेवि, गुरुसंतोष मात्रतः ॥

ā kalpaṃ janmanākoṭya, japavrata tapaḥ kriyāḥ I

tatsaraṃ saphalaṃdevi, gurusaṃtoṣa mātrataḥ II

172. हे सुंदरी! जर दुर्दैवी व्यक्ती आपल्या पूजनीय गुरूची सेवा करीत नसेल तर त्याची सर्व विद्या, तप, बल काहीच उपयोगाचे नाही (ते निष्फळ ठरतात). हे खरं आहे! हे सर्वोच्च सत्य आहे!

विद्यातपो बलेनैव, मन्द भाग्याश्च ये नराः ।

गुरुसेवां नकुर्वन्ति, सत्यं सत्यं वरानने ॥

vidyātapo balenaiva, manda bhāgyāśca ye narāḥ I

gurusevāṃ nakurvanti, satyaṃ satyaṃ varānane II

173-174. पूज्य गुरूंच्या कृपेशिवाय ब्रह्मा (विश्वाचा निर्माता), विष्णु (विश्वाचे रक्षणकर्ता), महेश किंवा शिव (प्रत्येक युगातील शेवटी विश्वाचा संहार करणारा),देवदेवता, देवर्षि, पितर, किन्नर, सिद्ध, चारण, यक्ष, तसेच दुसरे मुनिजन इत्यादी देखील आपापली कर्तव्ये पार पाडण्यात यशस्वी होऊ शकत नाहीत.हे देवी!, गुरुभाव हेच श्रेष्ठ तीर्थ होय. अन्य तीर्थे निरर्थकच होय. सर्व तीर्थांचा आधार (उगम) गुरुचरणाचा अंगठा होय.

ब्रह्मविष्णु महेशाश्च, देवर्षि पितृ किन्नराः ।

सिद्ध चारण यक्षाश्च, अन्येऽपि मुनयो जनाः ॥

गुरुभावः परं तीर्थ, अन्यतीर्थं निरर्धकम् ।

सर्वतीर्थाश्रयं देवि, पादाङ्गष्ठं च वर्तते ॥

brahmaviṣṇu maheśāśca, devarṣi pitṛ kinnarāḥ I

siddha cāraṇa yakṣāśca, anye'pi munayo janāḥ II

gurubhāvaḥ paraṃ tīrtha, anyatīrthaṃ nirardhakam I

sarvatīrthāśrayaṃ devi, pādāṅgaṣṭhaṃ ca vartate II

175. हीन, त्याज्य कर्मे त्यागून; अधम, अपवित्र स्थाने वर्ज्य करून - टाळून श्रीगुरुगीताजप करावा. श्रीगुरुगीतेचा जप केल्याने माणूस विजयी होतो.

जपेन जयमाप्नोति, चानन्त फलमाप्नुयात् ।

हीन कर्मत्यजेत्सर्वं, स्थानानि चाधमानि च ॥

japena jayamāpnoti, cānanta phalamāpnuyāt I

hīna karmatyajetsarvaṃ, sthānāni cādhamāni ca II

176-177. निषिद्ध आसनावर बसून ह्या ग्रंथाचे पठण केल्याने पापफळ मिळतील (हीनासन वर्ज्य करावे). प्रयाणाच्या वेळी, प्रस्थान ठेवण्याच्या वेळी, प्रवासास निघतेवेळी, शत्रूचे संकट उपस्थित झाल्यास, परचक्राचे भय निर्माण झाल्यास, श्रीगुरुगीतेचा जप करण्याने जय प्राप्त होतो.मृत्यूसमयी जप केल्याने मरणोत्तर मुक्ती किंवा मोक्ष मिळते. गुरुपुत्राची सर्व कर्मे सर्वत्र सिद्ध होतात.

जपं हीनासनं कुर्वन्, हीनकर्म फलप्रदम् ।

गुरुगीतां प्रयाणेवा, संग्रामे रिपुसंकटे ॥

जपन् जयमवाप्नोति, मरणे मुक्तिदायकम् ।

सर्वकर्मच सर्वत्र, गुरुपुत्रस्य सिद्धयति ॥

japaṃ hīnāsanaṃ kurvan, hīnakarma phalapradam I

gurugītāṃ prayāṇevā, saṃgrāme ripusaṃkaṭe II

japan jayamavāpnoti, maraṇe muktidāyakam I

sarvakarmaca sarvatra, guruputrasya siddhayati II

178. (भगवान शंकर किंवा शिव, देवी पार्वतीस समजावून सांगत आहेत) जे हे रहस्य तुझ्यासमोर मी आतापर्यंत सांगितले आहे, ते कोणासमोरही प्रगट करू नये. प्रयत्नपूर्वक हे रहस्य गुप्त ठेव. तू मला अत्यंत प्रिय आहेस म्हणून ही गुह्य गोष्ट मी तुला सांगितली.

इदं रहस्यं नो वाच्यं, तवाग्रे कधितं मया ।

सुगोप्यं च प्रयत्नेन, ममत्वंच प्रियात्विति ॥

idaṃ rahasyaṃ no vācyaṃ, tavāgre kadhitaṃ mayā I

sugopyaṃ ca prayatnena, mamatvaṃca priyātviti II

179. हे पार्वती, आपले सुपुत्र कार्तिकेय,गणेश तथा भगवान विष्णू आदि देवांनाही या शिकवणीवर विश्वास नसेल तर हे रहस्य सांगायला नकोच.

स्वामी मुख्य गणेशादि, विष्णवादीनां च पार्वति ।

मनसापि न वक्तव्यं, सत्यं सत्यं वदाम्यहं ॥

svāmī mukhya gaṇeśādi, viṣṇavādīnāṃ ca pārvati I

manasāpi na vaktavyaṃ, satyaṃ satyaṃ vadāmyahaṃ II

180. ज्याचे चित्त पूर्ण परिपक्व झालेले आहे, श्रद्धा आणि भक्ती ह्यांनी युक्त आहे त्यालाच हा गुरु गीतेचा उपदेश करावा.

अतीव पक्क चित्ताय, श्रद्धा भक्ति युतायच ।

प्रवक्तव्यमिदं देवि, ममात्माऽसि सदाप्रिये ॥

atīva pakva cittāya, śraddhā bhakti yutāyaca I

pravaktavyamidaṃ devi, mamātmā'si sadāpriye II

181. जो अभक्त, वंचक, कपटी, लबाड, धूर्त, पाखंडी, नास्तिक आहे अशाला ही गुरुगीता सांगण्याचे कधी मनातही आणू नये.

अभक्ते वंचके धूर्ते, पाखण्डे नास्तिके नरे ।

मनसापि न वक्तव्या गुरुगीता कदाचना ॥

abhakte vaṃcake dhūrte, pākhaṇḍe nāstike nare I

manasāpi na vaktavyā gurugītā kadācanā II

182. गुरु गीता मंत्रराज आहे. संसारसागरातून पार करणारे तारक आहे.ब्रह्मा (विश्वाचा निर्माता) इत्यादि देवतांच्या सामर्थ्याने आकारण्यात आला आहे आणि हा मंत्र (गुरु गीता) सर्व दु:ख, भीती आणि निराशा दूर करेल. या महान मंत्रास अभिवादन जो सर्व भयाचे निराकरण करतो. (या महान ग्रंथाचे पठण पूर्ण झाल्यानंतर शेवटचे वाक्य पुन्हा एकदा सामान्य नियम म्हणून वाचले पाहिजे.शेवटी “ओम नमः इति” उच्चारून हे पठण संपवले पाहिजे.)

संसार सागर समुद्धरणैक मंत्रम्

ब्रह्मादिदेव मुनि पूजित सिद्धमंत्रम् ।

दारिद्र्य दुःख भयशोक विनाश मंत्रम्

वंदे महाभयहरं गुरुराज मंत्रम् II

saṃsāra sāgara samuddharaṇaika maṃtram

brahmādideva muni pūjita siddhamaṃtram I

dāridrya duḥkha bhayaśoka vināśa maṃtram

vaṃde mahābhayaharaṃ gururāja maṃtram II

शब्द-अर्थ (शब्दार्थ)

आज्ञा चक्र :- मानवी शरीरातील भ्रुकुटी मध्ये स्थित शक्ति केंद्र.

अनाहत चक्र :- मेरुदंडातील हृदय क्षेत्रात स्थितीत शक्ति केंद्र.

अनाहत ध्वनी :- कोणत्याही वस्तूवर प्रहार केल्याविना होणारा आणि अंतरात व्यक्तिला ऐकू येणारा ध्वनी.

आनंदमय कोष :- आनंदाचे आवरण. व्यक्तिच्या आत्म्यावर निर्माण झालेले पहिले आवरण व लौकिक भ्रमाच्या रूपांतील आत्मा. मौलिक शक्ति या स्तरात आपल्या सर्वात सूक्ष्म आणि मूलभूत स्वरुपांत आहे.

अन्नमय कोष :- अन्नाचे आवरण. सर्व मानव शरीराच्या रूपात व्यक्तिगत आत्म्यावरील पाचवे आणि अंतिमआवरण.

आश्रम :- योग आश्रय स्थल. ही योग गुरुंचे वा शिक्षकाचे निवासस्थान आहे ज्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत लोक योगाभ्यास करतात.

ब्रम्ह :- संपूर्ण ब्रम्हांड आणि त्याही पलीकडे सर्वव्यापी सर्वोच्च दिव्यता वा ईश्वर वा सर्वशक्तिमान इत्यादी.

बुद्धी :- ब्रम्हांडीय शक्तिचे एक रूप आहे ज्याला व्यक्तिची विद्वत्ता म्हटले जाते अथवा विवेकाची क्षमता व त्यांत अहंकार एकरूप असतो.

चित्त :- व्यक्तिच्या मनाची सामुग्री. हा सर्व इंद्रीयांचा आधार आहे जिथून व्यक्ति स्वतंत्र इच्छेचा प्रयोग करते.

चित्त शक्ति :- ही मनाची कार्यशील ब्रम्हांडीय शक्तिचे एक रूप आहे, जिला अलौकिक शक्ति म्हटले जाते.

चक्र :- मेरुदंडातील शक्ति केंद्र.

गुरु :- आदरणीय शिक्षक जो शिष्याच्या अंतरातील अहंकार व अज्ञान दूर करतात, त्यांच्या स्वतःच्या अंतरात पहिले पासून असलेला ज्ञानाचा प्रकाश प्रकाशित होत असतो.

गुण :- मनाच्या सामुग्रीचे तीन गुण.

कारण शरीर :- व्यक्तिच्या आधीन आत्मा व ब्रम्हांडीय भ्रमाने वेढलेला आत्मा याला कारण शरीर म्हटले जाते.

क्रिया :- सर्व संस्कारांपासून व्यक्ति च्या मनाला शुद्ध करण्यासाठी जे शरीर, मन आणि सांसारिक जीवनात अनैच्छिक प्रतिक्रियांच्या रुपांत प्रकट होते.

कुंडलिनी :- सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति जी ब्रम्हांडाच्या रुपांत प्रकट होते. ही शक्ति गुदा आणि जननांगा मध्ये स्थित असून प्रत्येक मनुष्याच्या मेरुदंडाच्या आधारवर स्थित असते (मूलाधार).

कुंभमेळा :- हा एक नदी महोत्सव आहे. गंगा नदी किनारी भारतात दर बारा वर्षांनी साजरा केला जातो.

मनोमय कोष :- हा व्यक्तिचा आत्मा वा जीवात्मा वरील तिसरे आवरण आहे. हे सर्व इंद्रियांचे स्थान आहे जिथे स्वतंत्र इच्छेचा प्रयोग केला जातो.

माया :- लौकिक भ्रम व आपल्या सर्वात मूळ रुपातील ब्रम्हांडीय शक्ति.(महत्तत्व)

मणिपूर चक्र :- मानवी शरीरातील मेरुदंडातीलनाभि क्षेत्रात स्थित शक्ति

केंद्र.

मणी द्वीप :- हे सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्तिचे निवास आहेत. याला रत्नव्दीप म्हटले जाते आणि आनंद सागराने वेढलेला आहे. संस्कृत ग्रंथानुसार हा विविध असंख्य तंत्रापासून फार दूर विशाल आणि अनंत ब्रम्हांडाच्या आतील खोलीत स्थित आहे.

मंत्र :- हा एक पवित्र संस्कृत अक्षर वा शब्द वा वाक्य अथवा वाक्य समूह आहे आणि तो वाङ्मयीन सामुग्रीच्या रूपात कितीही पटीत असू शकतो.

मूलाधार चक्र :- गुदा आणि जननांगाच्या मधोमध स्थित मेरुदंडाच्या आधार स्थित ऊर्जा शक्ति केंद्र.

ॐ:- पवित्र संस्कृत अक्षर वा ध्वनी वा मंत्र आहे जो स्वतः मौलिक ब्रम्हांडीय शक्तिच्या स्वरूपाचे प्रतिनिधित्व करतो.

परा शक्ति :- सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति.

प्राणमय कोष :- हा व्यक्तिचा आत्मा वा जीवात्माला वेढलेला चौथा कोष आहे. याला 'जीवन ऊर्जा आवरण' म्हटले जाते.

प्रकृती :- मूलतः शक्तिचे स्वरूप वा ब्रम्हांड वा प्रकृती आहे.

प्राण :- ही ब्रम्हांडीय शक्ति व संपूर्ण ब्रम्हांडाला व्यापलेली गतिशील ऊर्जेचे एक रुप आहे. मानवी शरीरात जीवन ऊर्जेच्या आवरणातील जीवनशक्ति देखील आहे.

राजस :- मनाच्या तीन गुणांपैकी एक, ज्याच्या मुळे सर्व रुपांत सृजनात्मकता प्रकट होते.

सात्विक :- मनाच्या तीन गुणांपैकी एक ज्याच्या मुळे सांभाळ वा जीवनातील सर्व कार्ये सर्व रुपांत प्रकट होते.

समाधी :- ही निर्विचार अवस्था आहे. आत्मबोध होणाच्या आधीची सर्व योगक्रियांचा अंतिम उद्देश आहे.

शैव :- भगवान शिवाच्या अनुयायांचे एक दर्शन शास्त्र, जी हिंदूची तीन देवतां मधील एक आहे जिला एकत्रित रुपांत त्रिवेद च्या रुपांत ओळखले जाते.

शक्तिपात :- 'शक्तिचे अवतरण' सिद्ध महायोग तंत्रात साधकाला दीक्षा देण्यासाठी शक्तिपात परंपरेत संतां द्वारे वापरले जाणारे एक तंत्र वा पद्धत.

शक्ति :- मौलिक ब्रम्हांडीय शक्ति.

शक्तिपीठ :- मौलिक ब्रम्हांडीय शक्तिकेंद्र.

सिद्धमहायोग :- व्यक्तिगत कुंडलिनी शक्ति जागृती नंतर भव्य योगतंत्र, ज्यात सर्व शक्ती गतयोगतंत्र एकत्रित आहेत.हे शक्तिपात पद्धतीद्वारे वापरले जाणारे एक योगतंत्र.

स्वाधिष्ठान चक्र :- मेरुदंडितील जननांगाच्या क्षेत्रात मूलाधाराच्या वर स्थित शक्ति केंद्र.

सूक्ष्म शरीर :- यात संपूर्ण भौतिक शरीरा शिवाय सर्व कोषयेतात. हे शरीर मृत्यूनंतर भौतिक शरीराला सोडून पुन्हा अवतार घेते.

तमस :- मनाच्या तीन गुणांपैकी एक ज्याच्या मुळे सर्व रूपांचा विनाश होतो.

तंद्रा :- योग ग्रंथा नुसार ही जाग्रत आणि स्वप्न या मधील एक अवस्था आहे.

तांत्रिक :- तंत्राचे साधक योग तंत्रातील एक प्रकार.

वैष्णो देवी :- भारतात जम्मू काश्मीर राज्यातील हिमालयात त्रिकूट पर्वतावर स्थित देवी पीठ हे शक्ति केंद्र सर्वात लोकप्रिय आस्था स्थळ आहे.

विशोक :- दुःखाचा अंत.

विज्ञानमय कोष :- कारण शरीरावरील दुसरे आवरण बुद्धी आणि

अहंकार या कोषात स्थित आहेत. हे दोन्ही, चेतन व जड सर्व ऐंद्रीय प्रभावांचे निवास आहे.

योग :- सर्वशक्तिमाना बरोबर व्यक्तिचा आत्मा व जीवनाचे मिलन / विलय.

योगी :- कोणत्याही योग तंत्राचा साधक.

योगिनी :- कोणत्याही योग तंत्रातील महिला साधक.

शक्तिपात पद्धति के आश्रम

(अनुमार्गणीय और स्वायत्त)

1. महायोगिनी रचना, तारकेश्वर सिद्धयोग फाउंडेशन, भीरा खीरी, लखीमपुर खीरी, उत्तर प्रदेश, पिन - 262901, भारत, मोबाइल: +91 945 022 0221, ईमेल: tsfoundation21@gmail.com

2. सिद्धयोगिनी थनिष्का, मेलबर्न बीच, फ्लोरिडा, यूएसए, मोबाइल: +1(321)960-0445, ईमेल: supriyavarmakurup@gmail.com

3. देवी वर्तिका शुक्ला, सिद्ध महायोग फाउंडेशन, 806, न्यू आनंद अपार्टमेंट, प्लॉट 47, सेक्टर 56, गुरुग्राम, हरियाणा, पिन - 122011, भारत, मोबाइल: +91 981 996 2635, ईमेल: vartikashukla2000@gmail.com

4. सद्गुरु हागी, मेलबर्न, विक्टोरिया, ऑस्ट्रेलिया, +61 407 683 465, ईमेल: ghracer@hotmail.com

5. योगी वीरेंद्र, गाजियाबाद, उत्तर प्रदेश, भारत, +91 9999290388, ईमेल: virendrasfarswan@gmail.com

6. योगी अभिषेक वशिष्ठ, जयपुर, राजस्थान, भारत, +91

9079121514, ईमेल: abhijagriya@gmail.com

7. योगी गौतम, हैदराबाद, तेलंगाना, भारत, +91 9963359922, ईमेल: yogi.Shaktipāt@gmail.com

8. योगिनी रम्या देवी, बेंगलुरु, कर्नाटक, भारत, मोबाइल: +91 988 023 9480

9. पुनीत पाराशर, दुबई, संयुक्त अरब अमीरात, मोबाइल: +971 52 867 6684, ईमेल: puneetparashar39@gmail.com

10. योगिनी मनीषा, नई दिल्ली, भारत, मोबाइल: +91 799 110 9595

11. योगिनी विजया, जोहान्सबर्ग, दक्षिण अफ्रीका, मोबाइल: +27 83 682 2286, ईमेल: juss@mplanet.co.za

12. महायोगिनी परमेश्वरी, जंनगांव , तेलंगाना, भारत, मोबाइल: +91 9704424072, +91 7981407323

13. शालिन कुमार, कोल्लम, केरल, भारत, मोबाइल: +91 8281219592, ईमेल: shalin_kumar@sahajananda-ashram.com

14. योगी रामगणपति, पूर्वी गोदावरी, आंध्र प्रदेश, भारत, मोबाइल: +91 9494546139, ईमेल: ramaganapathi@sahajananda-ashram.com

15. योगिनी शिखा, गुरुग्राम, हरियाणा, भारत, मोबाइल: +91 9560046782, ईमेल: shikhatiwari512@gmail.com

16. श्याम ग्वालानी, नासिक, महाराष्ट्र, भारत, मोबाइल: +91 8275798148, ईमेल: shyampgwalani@gmail.com

17. योगिनी चांदनी आत्मिका, चेन्नई, तमिलनाडु, भारत, मोबाइल: +91 9080570782

18. योगिनी श्रीदेवी, हैदराबाद, तेलंगाना, भारत, मोबाइल: +91

9849590088

19. योगी भारद्वाज, रिचमंड, यूएसए, +1 (973) 393-4135

20. श्रीमती महालक्ष्मी, विशाखापत्तनम, आंध्र प्रदेश, भारत, मोबाइल: +91 80085 96898

21. योगिनी सुमित्रा देवी, राजमुंदरी, आंध्र प्रदेश, भारत, मोबाइल: +91 8309180149

22. योगिनी रमादान, लिंकन, नेब्रास्का, यूएसए, मोबाइल: +1(402)217-2363

23. योगी रंजीत, पुणे, भारत, +91 8899992493

24. योगी रंगा, हैदराबाद, भारत, +91 9866305772

25. श्री रवि कुमार कौसिक, हैदराबाद, भारत, मोबाइल: +91 8978611137

26. श्री अजय हमसागर, हैदराबाद, भारत, मोबाइल: +91 9449824331

27. श्री नागेश्वर राव, आंध्र प्रदेश, भारत, मोबाइल: +91 8639139422

28. श्री कमलेश पाड़िया, पुणे, महाराष्ट्र, +91 9765800457, +91 8530390457

29. नारायण कुटी संन्यास आश्रम, टेकरी रोड, देवास, मध्य प्रदेश, भारत, पिन - 455001, दूरभाष: +91 0727223891/31880, मोबाइल: +91 9977968108

30. स्वामी विष्णु तीर्थ साधन सेवा न्यास, 12-3, पुराना पलासिया, जोपत कोटि, इंदौर, मध्य प्रदेश, भारत, पिन - 452001, दूरभाष: +91 0731 566386/564081, मोबाइल: +91 9713468347

31. स्वामी शिवोम तीर्थ कुंडलिनी योग केंद्र, दुर्गा मंदिर, कलेक्टर बंगले के पास, छिंदवाड़ा, मध्य प्रदेश, भारत, पिन - 480001, दूरभाष: +91 07162 42640

32. स्वामी शिवोम तीर्थ आश्रम, मुकर्जी नगर, रायसन, मध्य प्रदेश, भारत, पिन - 464551, दूरभाष: +91 07482 22294

33. स्वामी शिवोम तीर्थ महा योग आश्रम, खारी घाट, जबलपुर, मध्य प्रदेश, भारत, पिन - 482008, दूरभाष: +91 0761 665027

34. देवात्मा शक्ति सोसाइटी, 74, नवाली गांव, पोस्ट दहिसर (मुंब्रा के माध्यम से), मुंब्रा पनवेल रोड, ठाणे जिला, महाराष्ट्र, भारत, पिन - 400612, दूरभाष: +91 022 7411400

35. शिवोम कृपा आश्रम ट्रस्ट, हाउस नंबर 28-1463/1, तेने बांदा, शिवोम नगर, चित्तौड़, आंध्र प्रदेश, भारत, पिन - 517004, दूरभाष: +91 9440069096, 08572 49048

36. योग श्री पीठ आश्रम, शिवानंद नगर, मुनि-की-रेठी, ऋषिकेश, उत्तराखंड, भारत, पिन - 249201, दूरभाष: +91 0135 430467

37. ओम कर आश्रम, वेरावल, गुजरात, भारत

38. ओम कार साधन आश्रम, आनंद, गुजरात, भारत

39. स्वामी विष्णु तीर्थ ज्ञान साधना आश्रम, कुबुडु रोड, केडी गुर्जर, गन्नूर, सोनीपत जिला, हरियाणा, भारत, दूरभाष: +91 0124 62150/61550

40. विष्णु तीर्थ सिद्ध महायोग संस्थानम, शिवोम कुटी आश्रम, कालेश्वर मंदिर के पास, बहादुरपुर रोड, अमलनेर पोस्ट, जलगांव जिला, महाराष्ट्र, भारत, पिन - 425401

41. गुरु निकेतन, शिव कॉलोनी, डबरा, ग्वालियर जिला, मध्य प्रदेश, पिन - 475110, दूरभाष: +91 07524 22153

42. स्वामी शिवोम तीर्थ आश्रम, रूट नंबर 97, पोंड एड्डी, सुलिवन कंट्री, न्यूयॉर्क, यू.एस.ए.

43. स्वामी महेश्वरानंद तीर्थ, सुनवाहा, रायसन जिला, मध्य प्रदेश, भारत, +91 7697648720

शक्तिपात पद्धति के संत

(अनुमार्गणीय इतिहास)

महान योगिनी लल्लेश्वरी

त्रिलोकी बाबा

स्वामी परमानन्द तीर्थ जी

स्वामी मुकुंदानंदतीर्थ जी

स्वामी गंगाधर तीर्थ जी

स्वामी नारायण देव तीर्थ जी

1. स्वामी शंकर पुरुषोत्तम तीर्थजी
    - (a) स्वामी नारायण तीर्थजी
        - (i) स्वामी नारायण यशवंत देखणे
            - (aa) ऐ एन चैटर्जी
            - (bb) आत्मानंद तीर्थ
    - (b) स्वामी लोकनाथ तीर्थजी
        - (i) स्वामी राव गुलवाणी
            - (aa) स्वामी ब्रह्म दत्तात्रेय कविश्वर
2. परम पूजनीय योगानंद जी
    - (a) स्वामी ठाकुर मान सिंह
        - (i) संत योगी कृपाल सिंह

(b) स्वामी दिलीप दत्त उपाध्याय

(c) माता रमा बाई

(d) <u>स्वामी विष्णु तीर्थ</u>

(i) स्वामी माधव तीर्थ

(ii) स्वामी ओमकारानन्द

(iii) स्वामी तारकेशवरानन्द तीर्थ

(iv) रामप्रकाश ब्रह्मचारी

(v) <u>स्वामी शिवोम तीर्थ</u>

(aa) स्वामी परमानन्द तीर्थ

(bb) स्वामी केवल कृष्ण तीर्थ

(cc) स्वामी गोपाल तीर्थ

(dd) स्वामी गोविंदानन्द तीर्थ

(ee) स्वामी भास्करानन्द तीर्थ

(ff) स्वामी सहजानन्द तीर्थ

(gg) स्वामी नित्यबोधानन्द तीर्थ

(hh) स्वामी निजबोधानन्द तीर्थ

(jj) स्वामी हरि ओम तीर्थ

(kk) स्वामी शिव मंगल तीर्थ

(ll) स्वामी शंकर चैतन्य तीर्थ

(mm) स्वामी आत्मबोधानन्द तीर्थ

(nn) स्वामी चेतन विलास तीर्थ

(oo) स्वामी राधा कृष्ण तीर्थ

(pp) स्वामी मुक्तानन्द तीर्थ

(qq) स्वामी विद्या तीर्थ

लेखकाबद्दल

लेखक ९७ वर्षांचे आहेत आणि सध्या ते भारतातील विजयवाडा शहरात राहतात. त्यांचे गुरु स्व. स्वामी शिवोम तीर्थ यांनी त्यांस शक्तीपात प्रक्रियेने अनुग्रहित केले. पूजनीय स्वामींनी पाच दशकांहून अधिक काळ हिमालयीन भागात ध्यान साधना केली. तदनंतर त्यांनी कुंडलिनी योगाच्या मार्गावर असंख्य शिष्यांना अनुग्रहित करून शक्तीपात पद्धतीचा वारसा पुढे नेला आहे.